
# 'स्व'-रूपवर्धिनी

काळोखाचा सागर कितीही अफाट असला तरी
प्रकाशाची बेटे ही असतातच
हा सागर सनातन आणि ही बेटेही सनातन
म्हणून मीच अखेर ठरवायचं
की काळोखाच्या लाटेवर वाहत जाणारा पराभूत
नावाडी मी होणार की
प्रकाशाच्या बेटावर सूर्यकिरणांची लागवड करणारा शेतकरी
— कुसुमाग्रज



कार्यवृत्त - १९९१ - ९२

# 'स्व'-रूपवर्धिनी

# कार्यवृत्त
# १९९१ - ९२

*मुखपृष्ठ कल्पना*
**प्रमोद बेहेरे**

*रेखांकन*
**शेखर साने**
**शशांक रासने**

# अंतरंग


☞ 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच. . . . — प्रा. विवेक पोंक्षे
☞ 'स्व'-रूपवर्धिनीचे विविध प्रकल्प — श्रीमती पुष्पाताई नडे
☞ कालबाह्य न होणारे व्यक्तिमत्व — श्री. यशवंतराव लेले
☞ साप्ताहिक युवक बैठक - एक प्रेरणाजनित्र — श्री. श्रीहर्ष सगरे
☞ अस्वस्थ वर्षाची अस्वस्थ पाने — श्री. गणेश राऊत
☞ आदर्श शिक्षण — श्री. पराग जगताप
☞ शाखावृत्त व शाखानुभव — सर्वश्री सुभाष चलवादी, विलास कुलकर्णी, शिरीष पटवर्धन कु. उज्ज्वला जोशी
☞ विविध प्रकल्पातील महिलांचे स्वानुभव —
☞ पथनाट्ये, प्रतिसाद आणि अपेक्षा — कु. मनीषा बोईन
☞ बेळगावचे शिबिर — कु. दीपाली पवार
☞ सामाजिक संस्थांचा आलेख पिढी दरपिढी उतरता का होतो? — श्री. अनिल शिंदे
☞ स्वयंसेवी संस्था — नवे रूप नव्या समस्या — श्री. मुकुंद संगोराम
☞ प्रकल्प पत्ते व यादी
☞ आर्थिक ताळेबंद
☞ कार्यकारिणी यादी


# * भूमिका *

'स्व'रूप वर्धिनीच्या कार्याला १४ वर्षे पूर्ण झाली. आतापर्यंतच्या अंकांपेक्षा हा अंक पूर्णत: वेगळ्या स्वरुपात काढायचा यंदा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे.

या अंकात वर्धिनीशी प्रत्यक्ष संबंधित नसणाऱ्या परंतु आता वर्धिनीत सामील होऊ शकणाऱ्या कार्यकर्त्यांचे लेख समाविष्ट केले आहेत. त्यांच्या लेखात परखड व तटस्थ विचार आहे.

वर्धिनीची उद्दिष्टे व मार्ग स्पष्टच आहेत.

**की घेतले व्रत न हे, आम्ही अंधतेने**
**लब्धप्रकाश इतिहास निसर्ग-माने**
**जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे**
**बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ।**

•••

# 'स्व'रूप वर्धिनी

**म्हणजेच . . . . . . . .**

- सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था
- व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्या द्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ
- आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपला वाटणारा परिवार.
- विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकवणारी कार्यशाळा.
- राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प'
- परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी आपुलकी निर्माण करणारी संघटना
- शाळेत प्रतिज्ञा फक्त म्हणून घेतली जाते. ती प्रतिज्ञा अंगी बाणावी, भिनावी व कृतीतून पाझरावी यासाठी शिक्षण माध्यमातून देशाची गरज पूर्ण करू इच्छिणारा दूरलक्ष्यी उपक्रम
- अर्थात, ही पूर्ण वेळेची शाळा नाही, शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प.

'स्व'रूप वर्धिनी हे एका सनातन विचाराचे रूप आहे. हा विचार एक अस्वस्थ विचार आहे. म्हणूनच तो चिरंजीव आहे. अस्वस्थ विचार कोणते ना कोणते तरी प्रारुप घेऊन समाजात प्रगट होत असतो. या विचारांची मशाल घेऊन जाणाऱ्या व्यक्ती, संस्था, संघटना, चळवळी यांच्यात चढउतार होत असतात. पण विचार जिवंत असतो. कधी कधी व्यक्तींच्या मर्यादांनी त्या विचाराने धारण केलेल्या एखाद्या मूर्त प्रारुपाचा क्षय होतो पण संधी येताच तो विचार दुसऱ्या कोणत्यातरी माध्यमातून परत आपले अस्तित्व जगाला जाणवून देत असतो.

या विचाराच्या अनेक रंगछटा आहेत. एखाद्या प्रारुपात एखादी घटना जरा जास्त गडद असते. पण तो विचार तोच असतो. प्राचीन काळी ऋषीवरांच्या गुरुकुलातून जो विचार प्रगटला तो रामकृष्णादि पुरुषांच्या पराक्रमातून जो विचार दिसला, आदिशंकराचार्यांपून स्वामी विवेकानंदां पर्यंत अनेकांच्या मुखातून जो विचार समाजाने ऐकला व विविध संघटनांद्वारे तो अनुभवला तोच विचार १३ मे १९७९ रोजी 'स्व'रूप वर्धिनीचे रूप होऊन दृष्य झाला.

'स्व'रूप वर्धिनी ही अशा विश्वव्यापी विचाराची एक छटा आहे. त्यामुळे विचारांचे सारे सुप्त सामर्थ्य तिच्यात आहे. म्हणूनच हे कार्य वर्धिष्णू आहे. वर्धिनीच्या कार्यपद्धतीच्या निश्चितीमागेही एक गृहितक ठामपणे जाणवते. Concentrated selected few produce better results.

— **प्रा. विवेक पोंक्षे**

# ❋ 'स्व-रूपवर्धिनी'चे विविध प्रकल्प ❋

आजकालच्या शिक्षणपद्धतीत वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, गृहपाठ शिक्षकांवरील अनेकविध जबाबदाऱ्या यामुळे इच्छा असूनही जे जीवन-शिक्षण म्हणता येईल अशा प्रकारचे शिक्षण शाळांमधून मुलांना मिळत नाही. मग ती परीक्षार्थी बनतात. या सगळ्या गडबडीत मूलभूत असे प्रेरणा जागृतीचे काम करावयाचे राहून जाते. हा अनुभव घेतल्याने जी पूर्णवेळ शाळा नसेल, अभ्यास करवून घेणारा क्लासही नसेल, पण मुलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते सर्व करणारी कार्यशाळा असेल असा प्रकल्प चालू करण्याची संकल्पना मनात बळावली आणि १३ मे १९७९ रोजी स्व-रूपवर्धिनीची स्थापना झाली.

विकासक्षमता असलेली परंतु सामाजिक/आर्थिक कारणांमुळे विकासाची संधी उपलब्ध नसलेली हुषार, होतकरु १२ मुले निवडून हा प्रकल्प चालू झाला.

वेगवेगळया शाळांमध्ये जाणारी मुले निवडचाचणीत उत्तीर्ण झाल्यावर येथे येतात व वर्षातून ३६५ दिवस रोज ३ तास आपल्या संपर्कात राहातात. येथे एकूण गणित, इंग्रजी, शास्त्र, हस्ताक्षर सुधारणा, लेखन, वाचन वेग असे १५ विषय शिकविले जातात. याकरिता शुल्क आहे मासिक ५० पैसे फक्त.

कामाचा विस्तार वाढल्यावर स्वतःच्या वास्तूची गरज भासू लागली. समाजानेही ह्या कामाचे मोल व मौलिकता जाणून सढळ हाताने मदत केली व आपण ३ मजली इमारत बांधली. या वास्तूचा पूर्णपणे उपयोग समाजासाठी होतो.व त्यात विविध प्रकल्प चालतात. त्यांचे तपशील खालील प्रमाणे -

**इमारतीतील शाखेव्यतिरिक्त प्रकल्प –**

१) मनाच्या जडण घडणी प्रमाणे शरीराच्या सुदृढतेकरिता पहाटे ५.३० पासून सुरू होते **व्यायामशाळा !**

२) **पाकोळी** नावाची छोट्या पाकोळ्यांसाठी बालवाडी – सकाळी १० ते १ यात आज ९० मुले आहेत.

३) सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार करणारे **आजोळ** – वेळ १.३० ते ५.००, संख्या ४०, वयोगट इ. ५ वी ते ७ वी.

४) स्वतःच्या 'स्व'त्वाची जाणीव व्हावी व तो 'स्व' स्वयंपूर्ण व्हावा याकरिता महिलांना व्यावसायिक शिक्षण

| | |
|---|---|
| शिवण वर्ग – २ ते ४ | संख्या २५ |
| होमनर्सिंग – १२ ते २ | संख्या २५ |

५) मुस्लिम महिला व मुलींकरिता मराठी भाषेचा वर्ग – संख्या १०

६) प्रौढ साक्षरता वर्ग – संख्या १०

७) बालवाडीतून शिकून बाहेर पडलेल्या बालांची बालशाखा. – संख्या १०

८) पुण्यातील विविध भागात वर्षाच्या ३६५ दिवसांत कार्यरत असणाऱ्या शाखा –
   १) रामकृष्ण शाखा - मंगळवार पेठ, पुणे
   २) विवेकानंद शाखा- छाब्रिया हायस्कूल, बापट मार्ग, पुणे
   ३) अखंडानंद शाखा – बिबवेवाडी, पुणे
   ४) भगिनी निवेदिता शाखा – आगरकर हाय., पुणे
   ५) समर्थ शाखा – मंगळवार पेठ, पुणे

समर्थ शाखेत मुलांची निवडचाचणी नाही. सर्वांना खुली.)

### शाखांमध्ये. चालणारे विविध उपक्रम –

१) आठवड्यातून एकदा मोड आलेल्या धान्याचा व दूधाचा पूरक आहार.

२) दर रविवारी मानसिक विकास बैठकीतून प्रेरणादायी पुस्तकाचे वाचन.

३) दर रविवारी युवकांसाठी विविध यशस्वी, समाजकार्यकर्त्यांच्या अनुभव कथनाचा कार्यक्रम.

४) रोजच्या कार्यक्रमामध्ये रोचक बदल घडवून आणणाऱ्या, शरीर व मन प्रसन्न ठेवणाऱ्या अभ्यासपूर्ण सहली.

५) कथा, कला, नाट्य वक्तृत्व, शास्त्र, काव्य, अभ्यास, सामाजिक प्रश्न व देशापुढील प्रश्न अशा नानाविध विषयांची माहिती करून देणारी व सर्व विद्यार्थ्यांना/एकमेकांच्या जवळ आणणारी व एकमेकांना जाणून घेण्यास मदत करणारी वार्षिक दोन शिबिरें.

६) गुरुपौर्णिमा, राखीपौर्णिमा, गणेशोत्सव, संक्रांतोत्सव इ. सण निराळ्याच बंधुभावात व एकजुटीच्याप्रेरणेने साजरे.

७) दिवाळीत निरनिराळ्या वस्त्यांतुन फराळ वाटप- आंतर भारती, बालग्राम, लोणावळा, कस्तुरबा आश्रम, हॉस्पिटल्स येथे वाटप.

८) निरनिराळ्या वस्त्यांमुधून वजन काटा, भीमनगर, रुग्णालये, अंधशाळा यांमधून रक्षाबंधानाचा कार्यक्रम.

९) निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांवरील पथनाट्याचे, निरनिराळ्या वस्त्यांतून सादरीकरण उदा. हुंडाबळी, तुमचे आमचे प्रश्न वस्त्यांचे प्रश्न, स्वच्छता.

१०) कुंभारवाडा व जवळपासच्या उपेक्षित वस्त्यांतून वर्धकांनी चालविलेले वस्तीवर्ग.

११) आंबेडकर जयंतीला रक्तदानाचा कार्यक्रम.

१२) विद्यार्थी सहाय्यक समिती, अनाथ महिलाश्रम, कुष्ठधाम यांसारख्या विविध संस्थांना भेटी देऊन त्यांचे प्रश्न समजावून घेणे व त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास.

१३) बारा मुलांनीशी सुरू झालेल्या ह्या प्रकल्पांत निरनिराळ्या योजनांतर्गत आता ३५०/४०० विद्यार्थ्यांचा सहभाग.

### आर्थिक स्थिती –

समाजाने आजपर्यंत ३०/३२ लाख रुपये दिले.

पैकी १६ लाखांची वास्तू, ४ लाख रुपये कायम स्वरूपी निधी, १० लाख आजपर्यंत मुलांच्या विकासावर खर्च झाला.

यात फी, औषधे, कपडे, पूरक आहार, औषधे, शस्त्रक्रिया, सहली, शिबिरे इ. साठी खर्च झाला.

सगळ्यांना सगळे दिले नाही पण ज्यांना जे हवे आहे ते सर्व दिले. कारण ही मुले म्हणजे फार मोठे राष्ट्रधन आहे. की जे राष्ट्रात धन उत्पन्न करू शकते त्याकरिता हे धन वाया घालवून चालायचे नाही.

•••

**त्या तेजस्वी डोळ्यांमधली वीज अजूनी सांगते । उत्तिष्ठत जाग्रत बंधुनो। उत्तिष्ठत जाग्रत ।।**

# वर्धिनीच्या वास्तूत चालणारे विविध प्रकल्प

### शिवणवर्ग

१९८८ मे मध्ये शिवणवर्ग महिलांसाठी सुरू झाला. प्रथम हा वर्ग एक महिन्याचा चालविला. उत्तम प्रतिसाद मिळाला म्हणून पहिल्या वर्षात एकदम दोन वर्ग चालू केले. हा वर्ग सहा महिने चालला व अशा प्रकारे प्रतिवर्षी एक या प्रमाणे वर्ग चालू आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी ३० मुली/महिला या वर्गाचा लाभ घेत आहेत. हा वर्ग सौ. शैलजा गुरव अतिशय समर्थपणे व ताकदीने हाताळतात. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्या प्रत्येक विद्यार्थिनीच्या अगदी जवळ गेल्या आहेत.

आतापर्यंत १७५ महिला वर्गाचा लाभ घेऊन गेल्या आहेत. प्रत्येकीने लहान मोठ्या प्रमाणात आपल्या संसारास आर्थिक हातभार लावण्यास मदत केली आहे.

### होम नर्सिंग वर्ग

गेले तीन वर्षे सौ. जयवंती कलबाग व श्रीमती दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा वर्ग चालू आहे. हा वर्ग मुली व महिला यांना अर्थिक दृष्ट्या अतिशय लाभदायी ठरला आहे. स्वत:ला आर्थिक फायदा तसेच समाजातील रुग्णांची सेवा केल्याचा आनंद व स्वत:बद्दल वाढलेला आत्मविश्वास असा तिहेरी गुणकारी हा वर्ग ठरला आहे. त्यामुळे सुरुवातीला दोन वर्षे वर्षाला दोन तीन महिने कालावधी या प्रमाणे वर्ग चालविले व यंदा सहा महिने कालावधीचा पूर्ण शिक्षण वर्ग सुरू केला आहे.

हा वर्ग पूर्ण करून गेलेल्या बहुतेक सर्वच महिला आता पैसे कमवू लागल्या आहेत. महिना सुमारे रुपये २०० पासून १,२०० पर्यंत त्या कमवतात. याचं सर्व श्रेय सौ. कालबागबाईंना दिले पाहिजे. कारण त्यांची शिकवण्याची पद्धत फारच चांगली आहे.

### बालवाडी प्रशिक्षिका वर्ग

हा वर्ग यंदाच आपण चालू केला आहे. वनस्थळी व वर्धिनी अशा दोन्ही संस्थांनी मिळून हा वर्ग चालू केला आहे. सौ. निर्मलाताई पुरंदरे यांनी त्यांच्या संस्थेतील सौ. रंजनाताई देशमुख यांना हा वर्ग घेण्यास पाठविले आहे. वर्गात ३० मुली आहेत व उत्तम तऱ्हेने व उत्साहाने मुली वर्गाला येतात.

### प्रौढ शिक्षण वर्ग व उर्दू महिलांसाठी मराठी भाषेचा वर्ग

प्रौढ वर्गात आतापर्यंत २५/३० महिला शिकून गेल्या व त्यातील काहींनी पुढे शिवण वर्ग पूर्ण केला. श्रीमती लक्ष्मी सरोदे या ७० वर्षांच्या महिलेने प्रथमच मतदान सही करून केले. याचा त्यांना फार आनंद झाला. अजुनही त्या नियमीत येतात. स्वत:ला रक्तदाबचा तसेच डोळ्यातील मोतीबिंदूचा त्रास होत असताना त्यांचं नियमित येणं हे एखाद्या विद्यार्थिनीला लाजवेल असं आहे. उर्दू वर्गासाठी सध्या २५/३० महिला आहेत. हा वर्ग वस्तीत चालतो. हा वर्ग कु. उज्ज्वला जोशी व प्रौढ शिक्षण वर्ग सौ. कबीरताई घेतात.

### स्वावलंबी योजना

महाराष्ट्र बँकेच्या मदतीने आपण काही महिलांना कर्ज मिळवून दिले. १९ महिलांना उद्योगासाठी कर्ज मिळाले ते १,५०० रुपयापासून १०,००० पर्यंत असे मिळाले व त्या पैशावर महिलांनी भाजीची गाडी, रेडिओ, कपडे, शिवण यंत्रे, पिको फॉल अशा प्रकारे व्यवसाय चालू केले आहेत. यातील काही महिलांना फार उशीरा कर्ज मिळाले. त्यामुळे कर्ज फेडण्यास त्यांची आता नुकतीच सुरुवात झाली आहे. परंतु अगदी

**केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे**

*सुरुवातीला ज्या महिलांना कर्ज मिळाले त्यांची मात्र कर्जातून आता लवकरच मुक्तता हाईल. काहींना रु. ५०, १५०, २०० असे हप्ते बसले आहेत व ते त्या दर महिन्याला देत असतात. काही बँकेने ह्यांना कर्ज देताना त्यांचे रिकरिंगचे पण एक खाते सुरू करून दिले आहे. त्यामुळे हप्ते देताना दर महिन्याला त्या रिकरिंगमध्ये पैसे भरत असतात. अशा प्रकारे त्यांना बचतीची पण सवय लागली आहे. शिवाय त्यांचे व्यवसाय पण चांगले चालू आहेत. एक मात्र महिला याला अपवाद आहे. तिला कर्ज मिळाले परंतु त्या वेळी तिला फार मोठा आजार झाला व तो पैसा आजारपणात खर्च झाला. हे सर्व तिने येऊन सांगितले व छोट्या प्रमाणात काम मिळवून मी आता कर्ज फेडीन असेही तिने सांगितले.* ***समाजातील गरजू महिला व बँक यांच्यामध्ये विश्वासाई दुवा म्हणून 'स्व'-रूपवर्धिनीने काम पाहिले व कर्जदार महिलांनीही कर्जाचे हप्ते ठरल्यावेळी फेडण्यास सुरुवात करून हा विश्वास सार्थ ठरविला आहे हे सांगताना अभिमान वाटतो.***

### ग्रंथालय

*वर्धिनीचे ग्रंथालय हा वर्धिनीच्या दृष्टीने एक अभिमानाचा विषय आहे. या ग्रंथालयात संदर्भग्रंथ, वैद्यकीय, अभियांत्रिकी, वाणिज्य, कलाशाखा या शाखांमधील दुर्मिळ पुस्तके आहेत. याचा उपयोग युवकांबरोबरच अन्य विद्यार्थीही मोठ्या प्रमाणात करून घेतात.*

*या ग्रंथालयात अनेक ग्रंथप्रेमींनी आपला अनमोल ग्रंथसंग्रह सप्रेम भेट म्हणून दिलेला आहे. आपणही अशी मदत करू शकतो.*

### रात्रअभ्यासिका

*ज्या विद्यार्थ्यांना अपुऱ्या जागेमुळे इच्छा असूनही घरी अभ्यास करणे शक्य नसते अशांसाठी इमारतीत दिवसभर व रात्रभर अभ्यासिका उपलब्ध आहे.*

*रात्री वर्धिनीचे युवक, १० वी व १२ वी चे विद्यार्थी याचा पुरेपूर फायदा घेताना दिसतात. गेल्या काही दिवसांपासून सदर अभ्यासिका रात्री ९ ते १२ या वेळात वर्धिनी व्यतिरिक्तच्या खरोखरच गरजू असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेली आहे.*

### बालशाखा

*ही आपण नवीनच सुरू केली आहे. आपल्या बालवाडीतून मुले शाळा सोडून दुसऱ्या शाळेत जातात. व त्यांचा मग संपर्क राहात नाही. तो राहावा व आपण तीन वर्षे घेतलेली मेहनत वाया जाऊ नये म्हणून आणि वशिषत: या मुलांच्या पालकांच्या आग्रहाखातर आपण ही शाखा सुरू केली आहे. शाळा सुटल्यावर ही छोटी मुले, मुली सायं ५.३० ला इमारतीत येतात व ७.३० पर्यंत छान बागडत असतात. यात त्यांचे पाठांतर, वाचन, लेखन, व खेळ घेतले जातात. या मुलांसाठी आपण बडबड गीतातून योगासन बसवली आहेत व तो बालचमू ती फार सुंदर करतात. या शाखेला प्रमोद जाधव सारख्या खेळकर व मुलांत मिसळणारा शिक्षक लाभला आहे. तसेच श्रीमती मुळे आजी गोष्ट सांगण्यास आठवड्यातून दोनदा येतात. हा बालचमू ती गोष्ट ऐकण्यास फार उत्सुक असतात. एखाद्या दिवशी कोणी नसेल तर रुपाली दातार नावाची इयत्ता तिसरी मधील मुलगी शाखा घेते. हे विद्यार्थी प्रमोद दादाच्या नेर्तृत्वाखाली म्हणतात,* ***"आम्ही छोटेसे बहिण भाऊ - उद्याला मोठाले होऊ"***

***फॅमिली प्लॅनिंग असो. ऑफ इंडिया पुणे शाखा या संस्थेने आम्हाला स्त्रियांचे वर्ग व त्याला उपयोगी अशा वेगवेगळ्या उपक्रमांना मदत केली. अशा प्रकारचे सहाय्य १९८९ पासून ही संस्था आम्हाला करीत आहे व भविष्यातही आम्हाला तिचा असाच उपयोग होईल अशी आम्ही आशा करीत आहो!***

**- पुष्पाताई नडे**

---

**बाळपणाच्या गमती जमती**
**एक त्यातली अजुन हसते**
**पुस्तकातले मोरपिस ते**
**हळूच गालावरुनि फिरते**

## ❀ कालबाह्य न होणारे व्यक्तिमत्वे ❀

"ईश्वराच्या शोधासाठी कुठे जाणार? गरीब, दु:खी, दुर्बल हेच तुमचे ईश्वर नाहीत काय?" हा प्रश्न आपल्या देशबांधवांना स्वामींनी विचारला होता. त्यास दहा दशके पुरी झाली! विसाव्या शतकाचे दहावे दशक सुरू झाले. एकविसाव्या शतकाचा संधीप्रकाश दिसू लागला. दरिद्र- देवांची संख्या ४० कोटी झाली! दु:खी अन् दुर्बलांची संख्या तर त्याहूनही अधिक झाली!! पण या दीनदेवांची, रुग्णदेवांची, शबलेश्वरांची पूजा बांधायची कुणी? या जनताजनार्दनाची पूजा कोणत्या उपचारांनी करायची? कशी करायची याचा विचार क्वचितच कोणी करताना दिसतो.

**पश्चिमेतून पूर्वेस आवाहन !**

स्वामींनी शताब्दीपूर्वी सर्वसंगपरित्यागास वाहिलेला काषायवर्णी पेहराव धारण करूनच सर्वजनसंपर्कासाठी वराहनगरहून पदयात्रा सुरू केली. बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान, सौराष्ट्र असे जनजीवन पाहात पाहात मुंबईहून पुण्यास स्वामीजी आले त्याला पुरी १०० वर्षे झाली. दक्षिण भारताची पदयात्रा पुरी करून ते पश्चिमेकडे दिग्विजय करण्यास गेले. पण भारतच आपले कार्यक्षेत्र होय. विदेशतील आपल्या कार्याच्या गौरवाचे मूल्य एवढेच की त्यामुळे भारत जागृत होईल' हा त्यामागील उद्देश स्पष्ट होता. एका अमेरिकन महिलेने स्वामींना अडचणीच्या वेळी विचारपूस करून मदत केली व सर्वधर्मपरिषदेत जाण्यातील अडथळे दूर केले आणि मग अनेक युवक - युवती त्यांच्या विचारवैभवाने प्रभावित झाले. सारे अमेरिकन स्त्रीजीवन पाहून स्वामी भारावून गेले. 'रूपाने लक्ष्मीसारख्या व गुणाने सरस्वतीसारख्या असणाऱ्या त्या साक्षात जगदंबांना पाहून स्वामींना वाटले, 'आपण (भारतीय) काय माणसे आहोत?'

**हे वीर विवेकानंद हिंदुयशमूर्ती**
**हे युवकप्रवर तू युवहृदयांची स्फूर्ती**

**सहस्र स्त्रियांची आवश्यकता :**

आपल्या गुरुबंधूंना ही हृदयांतरीची खंत कळवत असतांना स्वामीजी लिहितात, "मृत्यूपूर्वी अशा साक्षात् जगदंबेप्रमाणे असणाऱ्या एक हजार स्त्रिया जर मी आपल्या देशात तयार करू शकलो तर मला शांतिपूर्वक मरण येईल, अन् असे जर होईल तरच आपल्या देशातील लोक 'मनुष्य' या संज्ञेस पात्र ठरतील!"

आपल्या देशबांधवांनी 'मनुष्यत्व' गमावल्याचे स्वामीजींनी परिक्रमेच्या काळात अनुभवले होते. म्हणून



ते वारंवार म्हणतात," हे कार्य संपादन करण्यासाठी प्रथम माणसे हवीत आणि मग पैसा!" अशी माणुसकी असलेली माणसे प्रत्येक शहरात दहापंधरा तरी मिळतील असा त्यांचा आशावाद होता. पण मत्सरग्रस्त समाजाची कटु प्रचीती घेऊन ते म्हणतात, "आपापसातील मत्सराचा त्याग करून एखाद्या कार्यासाठी आपण एकत्र येऊ शकत नाही हा आपला मोठा राष्ट्रीय दुर्गुण आहे. ते आपले राष्ट्रीय पाप आहे." अर्थात नुसते दोष दर्शन करून स्वस्थ बसणारे स्वामीजी

नव्हेत ते उपायही सुचवतात. ते म्हणतात, 'समजा काही निःस्वार्थ व परहितेच्छू संन्यासी जर गावोगावी, खेडोपाडी भ्रमण करून शिक्षणाचा प्रसार करतील, चांगल्या उपयुक्त गोष्टी सांगून, चांगले उपाय योजून बरोबर नकाशे, कॅमेरे इ. वस्तू घेऊन जर ते उच्च नीच साऱ्याच जातींच्या उन्नतीसाठी चोहोकडे फिरतील तर त्यामुळे कालांतराने सगळ्यांचे हित होणार नाही काय?'

स्वामीजींच्या काळात हे स्वामीजींचे स्वप्न पुरे झाले नाही. पण १०० वर्षांनंतर आज तरी असे युवक-अशा युवती अन् असे संन्यासीही साक्षरता व सुसंस्कृतता यांचा प्रचार करत गावोगाव हिंडतील, गल्ली गल्लीतून निरक्षरांचा, रुग्णांचा, दीनदलितांचा शोध घेऊन त्यांना सहाय्यभूत होतील तर किती गोमटे होणार नाही का?'त्यामुळे राष्ट्राचे स्वत्त्व आपण त्याला पुन्हा प्राप्त करून दिले पाहिजे आणि सर्वसामान्य जनतेस उन्नत बनविले पाहिजे.' असे स्वामीजींनी म्हटले आहे. यासाठी सरकार व जनतेपुढे पैशाचा प्रश्न उभा राहतो. त्यावर स्वामीजी म्हणतात, "आपण गरीब आहोत असे समजू नका. केवळ पैसा हीच जगातील शक्ती नव्हे. चांगुलपणा, पावित्र्य हीच खरी शक्ती होय. साऱ्या जगात हीच खरी शक्ती आहे.

स्वामीजींनी अर्थशक्तीचा निषेध केलेला नसून शुद्ध प्राधान्यक्रम मात्र स्पष्ट केला आहे. त्यांना खऱ्या शिक्षणाचे, मनुष्य घडणीच्या शिक्षणाचे काम करायचे होते. त्यासाठी आपल्याला ज्वलंत, उत्साही अशा काही तरुण पिढ्यांची आवश्यकता असल्याचे एका पत्रात ते म्हणतात. ते शिष्य "बुद्धिमान असावेत, धीट असावेत, मृत्यूच्या जबड्यात उडी घेण्याची त्यांची तयारी असावी, सागर तरून जाण्याची देखील त्यांना भीती नसावी." अशी अपेक्षा व्यक्त करून स्वामी पुढे लिहितात, 'असे शेकडो स्त्रीपुरुष हवे आहेत, आटोकाट प्रयत्न अस काही लोक जमवा आणि पवित्र बनविणाऱ्या आपल्या साच्यात त्यांना टाकून द्या.' एका मोठ्या संघटनेचे स्वप्न ते पाहात होते. रामकृष्ण संघ त्यासाठीच त्यांनी उभा केला पण त्यांचं स्वप्न फार भव्यदिव्य होतं. ते साकार करायला युवा पिढीनं कंबर कसायला हवी आहे. स्वामीजींचा आदर्श समोर ठेवणाऱ्या संस्था, संघटना काही कमी नाहीत पण कामाची जी निकड त्यांना जाणवायला हवी ती तेवढ्या प्रमाणात जाणवते की नाही असा प्रश्न मनात येतो. कदाचित ही निकड त्यांना जाणवत असली तरी आपल्या मर्यादांनी मर्यादून गेल्यानं त्यांना शतकानंतरही स्वामींच्या स्वप्नातील भारत 'उभा' करण्यात पुरेसं यश येतांना दिसत नाही.

जगभरच्या प्रगत जनांना विजेचा झटका देणारं ते सर्वधर्मपरिषदेतील छोटसं भाषण होऊन ९९ वर्ष होऊन गेली. आणखी ९ महिन्यांनी त्याला एक शतक पुरं होईल! आणि स्वामीजींनी आपलं अल्पसं आयुष्य अनंतात विलीन केलं त्यासही १० वर्षांनी शतक पुरं होईल.

स्वामीजींची निर्वाण शताब्दीही साजरी होईल. खूप भाषणे होतील, खूप पुतळे उभे राहतील. खूप रस्ते त्यांच्या नावाने प्रसिद्ध होऊन 'एस्. व्ही. रोड' बनून विस्मरणाच्या गर्तेत जातील पण या देशाचं रूप पालटेल का? स्वामींच्या स्वप्नातील भारत दिसेल का? ते अवघड आहे. पण अशक्य मात्र नाही.

'साऱ्या जगात आपण विद्युत्शक्तीचा संचार करायला हवा. रिकाम्या गप्पा मारण्याने किंवा नुस्ती घंटा वाजवीत बसण्याने काही ते साध्य होणार नाही.' हे स्वामींचे शब्द आपण नीट समजून घेऊ या. वृथा वाद, तत्त्वज्ञानाचं काथ्याकुट, भांडणे, मत्सर हे सोडूया. कर्मकांड फेकून देऊया आणि येते दशक (१९९२ ते २००२) हे विवेकानंद दशक म्हणून अशा रीतीने

*With Best Compliments from*

**M/S BALDOTA SAMAL AND ASSOCIATES**

"Darshan"
1,B. J. Road,
Pune – 411 001.
☎ 663737/666844

घालवूया की आमच्या प्रत्येकाच्या जीवनात विवेकानंद विचारांचा विद्युत् संचार झाल्याचे वातावरणात सर्वांना जाणवू द्या. त्यांच्यातही तो संचार होऊ द्या. देशातील अनेक राज्ये अशी आहेत की तेथे छोट्यातल्या छोट्या खेड्यापर्यंत विजेची तार पोचली आहे. विजेचा दिवा लागणार आहे. आता या दशकात त्या विद्युद्दीपाच्या प्रकाशाने ज्ञानदीप लावण्याचं म्हणजेच हा देश साक्षर, सुसंस्कृत अन् सुसंघटित करण्याचं व्रत घेऊया. हे काम हजार एक माणसांचं आहे. असे एकदा स्वामीजी म्हणाले होते. पण आता कामाचा व्याप एवढा वाढला आहे की लक्ष लक्ष युवक युवतींना आपलं सारं जीवन नाही तरी निदान हे दशक तरी नरेंद्र विचारांचा व्यवहार करण्यासाठी 'इदं न मम' म्हणून समर्पित करावं लागेल. असे घडू शकेल. हे अशक्य नक्कीच नाही. रामकृष्ण संघाचे ४/५ सहस्र साधूसंन्यासी आज हे करताहेत. रा. स्व. संघाचे ५/१० सहस्र प्रचारक हे करताहेत, विवेकानंद केंद्राचे २/४ सहस्र जीवनव्रती ह्या कामात व्यग्र आहेत. वनवासी कल्याण आश्रमाचे १/ सहस्र कार्यकर्ते वनवासी, आदिवासी, गिरिजन, हरिजनांसाठी जीव पाखडताहेत. काहीशे गांधीवादी दुर्गम भागात जाऊन दीनदलितांशी एकरूप होऊन गेले आहेत. कुठे कुठे सर्वोदयवाद्यांचे प्रामाणिक प्रयत्न फलद्रूप होताहेत. सेवादलाचे सैनिकांनी काही ठिकाणी श्रमकन्यांच्या, कष्टकन्यांच्या संघटना बांधल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नैराश्याला तर स्थान नाहीच. प्रश्न आहे कामास गती देण्याचा. हातात हात घालून काम करण्याचा. मग विवेकानंदांचा आणखी एखादा अवतार होण्याची वाट बघायला नको. स्वामीजीच रामकृष्णांना लिहिलेल्या पत्रात म्हणाले आहेत, 'चारित्र्य घडवा, तसे झाले की मी तुमच्यात आलोच म्हणून समजा. स्त्रीपुरुष मिळून आपल्याला दोन हजार, दहा हजार, नव्हे वीस हजार संन्याशांची आवश्यकता आहे." या स्वामींच्या वाक्यात 'लक्ष लक्ष'. संन्याशांची आवश्यकता आहे' ही भर सहजपणे घालता येते. नव्हे तोच या वाक्याचा कालसापेक्ष अर्थ आहे. रामकृष्णांचे नाव घेऊन काम करतांना कसे बळ येते हे स्पष्ट करताना स्वामी म्हणाले आहेत, " जेथे त्यांचे (रामकृष्णांचे) नाव जाईल तेथला जंतू देखील देवता होऊन जाईल, नव्हे प्रत्यक्ष होतोच आहे." पुढे तर ते जणु भविष्य वर्तवतात ; "जे कोणी माझे हे पत्र वाचील त्याच्या हृदयात माझे हे भाव संचरतील."

स्वामीजींनी हे लेखन कशा भावनिक पातळीवर केले आहे ते त्यांच्याच पुढील शब्दाशब्दांतून व्यक्त होते आहे. "स्वामीजी म्हणतात-" माझा हात धरून जबरदस्तीने कुणीतरी मला हे लिहायला भाग पाडत आहे असे माझ्या अनुभवास येत आहे." अन् अशा उदात्त - विशाल मनानं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना बारीक सारीक सूचना त्यांनी देऊन ठेवल्या आहेत. शतकानंतरही त्यात काही मूलभूत बदलाची गरज दिसत नाही. अगदी बोलावं कसं तेही ते पत्रात सांगताहेत "प्रभावी व आकर्षक वक्ता बनण्याचाप्रयत्न करा. लोकांमध्ये जणु विद्युत्संचार करा. लोकांशी वितंडवाद करू नका." दमल्याने, नैराश्याने, वैफल्याने काम थांबवून विसावा घेणाऱ्यांना ते विचारतात, "विश्रांती घेण्याची गोष्ट तुम्ही बोलू कसे शकता? देहत्यागानंतर जी काय विश्रांती मिळणार आहे ती मिळेल. केवळ वक्तृत्वाने काय होणार? कर्तृत्व-नेतृत्वही कसं मिळतं ते विवेकानंद स्पष्ट करतात. नेतृत्व हवे असेल तर सगळ्यांचे दास व्हा, यशाची हीच

*With Best Compliments from*

**M/S LANDMARK CONSTRUCTIONS**

"Darshan"
1, B. J. Road,
Pune – 411 001.
☎ 666844

**"यापुढे मातृभूमी एवढ्या एकाच दैवताची पूजा करा, बाकीचे देव निरर्थक आहेत" – स्वामी विवेकानंद**

गुरुकिल्ली आहे." नवे कार्यकर्ते घडायचे तर त्यांना नाना देशी धाडून स्वतंत्रपणे पण शिस्तीत काम करू दिले पाहिजे. हे रामदासांनी सांगितलेले तत्त्व बंगालचे रामदास म्हणून ओळखले गेलेले स्वामी पुनश्च तसेच मांडतांना दिसतात. "तुमच्यापासून दूर जाऊन कामास लागल्याशिवाय तुमचे कार्यकर्ते स्वत:चा विकास करून घेऊ शकणार नाहीत."

स्वामी विवेकानंद स्पष्टपणे सांगतात. "उदात्त ध्येयवाद, प्रामाणिकपणा, आणि अपरिमित प्रेमभाव या योगे विश्व जिंकता येते. असे मी माझ्या क्षुद्र जीवनात प्रत्यक्ष अनुभवले आहे." स्वामी हे असं म्हणाले आहेत. आज त्या विश्वविजयी भाषणाची शताब्दी होत असतांना साऱ्या कार्यकर्त्यांना हे नरेंद्रवचन दिलासा देणारे ठरेल.

रोमा रोलां सारख्या फ्रेंच लेखकास स्वामी विवेकानंदांच्या निर्वाणानंतर ३० वर्षांनी त्यांच्या विचारांनी विद्युत्- संचार होतो आहे असा अनुभव आला आहे. आपण कार्यकर्ते म्हणविणारे तर स्वामीजींचे प्रत्यक्ष वारस म्हणवतो आहोत! आपल्या परिसरात या देशाच्या कानाकोपऱ्यात, आशावाद, विधायक क्रियावाद, परस्परविश्वास, हार्दिक सहकार्य आणि सामर्थ्य यांचे विद्युत चुंबकीय क्षेत्र निर्माण व्हायला हवे.

**— यशवंतराव लेले**

# आता यांचे स्मरण तेवढे शक्य आहे

***माणसे संपतात पण त्यांची स्वप्ने संपत नाहीत ती मानवजातीबरोबर सदैव चालतच राहातात. अशीच शिक्षण विषयक स्वप्ने अनुताईंनी पाहिली प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपड केली त्या अनुताईंची स्वप्ने आम्ही अस्तित्वात आणू! अनुताईंचा वसा खाली पडू देणार नाही. त्यांचा वारसा समर्थपणे आम्ही चालवू***

***पद्मश्री अनुताई वाघ (वर्धिनी कार्यकारिणी सदस्या)***
***श्रीमती मुगलखोर बाई***
***श्री. मारुती शेडगे***
***श्री. ना. म. होनप***

# ❄ साप्ताहिक युवक बैठक - एक प्रेरणाजनित्र ❄

Knowledge is power... आपणांपैकी प्रत्येकाने शक्य तितके ज्ञान वाढविणे, विशेषत: आपल्या अंगीकृत कार्यास अगदी आवश्यक अशा राजकीय इतिहासशास्त्र, राजकीय शासनशास्त्र आणि राजकीय अर्थशास्त्र या तीन शास्त्रांचे काही ना काही तरी अध्ययन प्रत्येकाने केलेच पाहिजे. नुसते ज्ञान लंगडे तर नुसते कर्म आंधळे. . "

- स्वा. सावरकर

समर्थ कार्यकर्त्यांचा संच असणे ही कोणत्याही संघटनेला आवश्यक असलेली महत्त्वाची गोष्ट आहे. परंतु ती एकमेव नाही. संघटनेला असलेले भक्कम वैचारिक अधिष्ठान ही संघटना वृद्धीसाठी तितकीच अनिवार्य गोष्ट आहे. संघटनेचा रथ जर व्यवस्थित चालायचा असेल तर कार्यकर्त्यांचे बळ व त्यांची वैचारिक बैठक ही रथाची दोन चाके तितकीच सक्षम असली पाहिजेत.

या दोन्ही गोष्टी साधण्यासाठी म्हणजेच कार्यकर्त्यांचा विचार करणे व त्यांची वैचारिक बैठक पक्की करणे या हेतूने स्वरूपवर्धिनीत मानसिक विकास बैठकांचे आयोजन केले जाते सर्व युवकांसाठी दर रविवारी दुपारी ४ ते ५ या वेळात ही बैठक घेतली जाते व गेली ९/१० वर्षे दर रविवारी नियमितपणे हा उपक्रम सुरू आहे.

मुलांना देशापुढील समस्यांची माहिती व्हावी व त्यावर मात करून या देशाला पुन्हा परमवैभवात नेण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत ही वर्धिनीच्या कामामागील प्रमुख प्रेरणा आहे. फुटीरतावादी चळवळी (उदा. काश्मीर ,आसाम यांसारखे ज्वलंत प्रश्न) देशाची आर्थिक, सामाजिक, क्रीडा यांसारख्या सर्व क्षेत्रातील पिछेहाट यांसारखे विषय युवकांसमोर मांडले जातात.

सध्याचे युग हे परिवर्तनाचे युग आहे. भावी काळाला वेगळे वळण देणाऱ्या अनेक घटना सध्या जगात घडत आहेत. जगातील सत्तासमीकरणे बदलत आहेत. जागतिक राजकारणात अनेक प्रवाह येऊन मिसळत आहेत. या सर्व घडामोडींचा परिणाम साहजिकच भारतावर अपरिहार्यरित्या होणार आहे. अशा सर्व घडामोडींची माहिती वेगवेगळ्या तज्ञांकडून युवकांना करवून देण्यात येते व त्याचे संभाव्य परिणाम काय होणार आहेत यसंबंधी विचार विनिमय केला जातो.

गेल्या काही दशकांमध्ये ज्या देशांनी अल्पावधीत आपली प्रगती साधली आहे अशा देशांच्या आर्थिक परराष्ट्रीय व तत्सम धोरणांचा अभ्यास करून भारताच्या संदर्भात अशा काही उपाय योजना करता येतील का अशा स्वरूपाचा विचारही या बैठकांमधून मांडला जातो. 'शेजारील राष्ट्रांचा परिचय' या सारख्या सत्रांतून आपल्या सरहद्दीला लागून असलेल्या शेजारी राष्ट्रांची सर्वांगीण माहिती युवकांना दिली जाते.

आपल्या वृत्तपत्रांमधून सतत निराशादायक चित्र उभे केले जाते. परंतु समाजात असेही काही ध्येयधुंद लोक असतात की या समाजाचे काही भले व्हावे या हेतूने ते विविध क्षेत्रात निरलसपणे काम करीत असतात. दुर्दैवाने अशा कामांना पुरेशी प्रसिद्धी मिळत नाही. व समाजातील सर्वांपर्यंत त्यांच्या कार्याची माहिती पोहचत नाही. परंतु वर्धिनीत अशा कृतीशील कार्यकर्त्यांना आवर्जुन बोलाविले जाते. व त्यांच्याकडून त्यांच्या कार्याची माहिती घेतली जाते. युवकांमध्ये प्रेरणा जागृतीसाठी अशा सत्रांचा खूप उपयोग झाला आहे.

युवकांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा हा देखील या बैठकीचा एक उद्देश असल्याने यादृष्टीने देखील काही सत्रे घेतली जातात. या बैठकांमधून

परिसाच्या संगे लोह बिघडले
लोह बी घडले सुवर्णची झाले
शिवबाच्या संगे ताना बिघडला
ताना बी घडला शिवरूप झाला



युवकांमध्ये साहसी वृत्ती वाढीस लागावी, असे प्रयत्न होतात. याबरोबरच प्रतिकूल परिस्थितीवर धैर्याने मात करून उद्योगात यशस्वी ठरलेल्या उद्योजकांचे स्वानुभवाचे बोलही युवकांच्या मनात नवी आशा जागृत करून जातात.

या भूमीत जन्मलेली नररत्ने व त्यांची चरित्रे आपल्या देशाचा उज्वल इतिहास, विविध युद्धकथा नेहमीच प्रेरणादायी ठरतात.

या बैठकीला कोणताही विषय वर्ज्य नाही. मर्चंट नेव्हीची ओळख यांपासून ते आखाती युद्धापर्यंत, तर संतांचे कार्यापासून ते विज्ञान आणि अध्यात्म यापर्यंतचे वेगवेगळे विषय युवकांपुढे त्या त्या क्षेत्रातील दिग्गजांकडून मांडले गेले व मांडले जातात.

परंतु आम्हाला या बैठकीचे स्वरूप एवढेच सीमित ठेवायचे नाही तर या बैठकीला थोडे वेगळे वळण देण्याची इच्छा आहे. या बैठकांनी खोलीच्या चार भींतींची सीमा ओलांडावी अशी कल्पना आहे. युवकांनी विविध क्षेत्रात जाऊन काही प्रकल्प राबवावेत काही कार्यशाळा आयोजित कराव्यात. प्रत्यक्ष कार्यानुभव घ्यावा. त्यादृष्टीने विषयांची, कामाची आखणी स्वत:च करावी अशी अपेक्षा आहे. किंबहुना काही प्रमाणात हे सुरू झाले आहे. हे जर असेच चालू राहिले तर साप्ताहिक बैठक ही प्रेरणाशक्ती निर्माण करणारे जनित्र ठरेल.

— **श्रीहर्ष सगरे**

# रविवारची मेजवानी

| वक्ते | विषय |
|---|---|
| कु. स्मिता देशपांडे | नागालँडमधील अनुभव |
| **युवकांचे आंबवणे येथील शिबिर** | |
| श्री. माधव मेहेंदळे | स्वत:च्या कामाचे अनुभव. |
| श्री. दादा पुणेतांबेकर | वैज्ञानिक दृष्टी |
| **गणेशोत्सव चर्चा** | |
| श्री. सूर्यनारायण राव | आशावाद |
| श्री. केशवराव केळकर | वनवासी क्षेत्रातील / दुष्काळी कामाचा अनुभव |
| **शिक्षक शिक्षण शिबिर** | |
| श्री. मोरोपंत पिंगळे | सध्याची देशस्थिती |
| श्री. बापूराव जोगळेकर | मद्रासमधील विविध उपक्रम |
| श्री. सुधीरराव आपटे | धंद्यातील यशाच्या पायऱ्या. |
| श्री. सनत भाटे | मर्चंट नेव्हीची माहिती |
| श्री. सुदर्शनजी | देशस्थिती |
| **लेसली सॉनी तर्फे शिबिर** | |
| श्री. माधवराव काणे | तळासरी प्रकल्प (तळासरीत शिकलेले कार्यकर्ते परत तेथेच कामाला कसे मदत करतात.) |
| श्री. दिलीप करंबेळकर | आजची राजकीय परिस्थिती |
| श्रीयुत चैनी | रिलायन्स व धिरुभाई अंबानी आणि व्यापारातील दूरदृष्टी |
| श्री. दादा वेधक | रामजन्मभूमीचा लढा |
| डॉ. अनिल गोडबोले | सेवादलाच्या मेळाव्यातील अनुभव कथन |
| **काश्मिर संबंधी चर्चा** | |
| श्री. मिलिंद केळकर | कमांडोज कसे तयार करतात. |
| डॉ. मधू पानसे | मायक्रो बायॉलॉजी |
| **तरुणांचा मेळावा १३५ तरुण सहभागी** | |
| श्री. दि. दा. जोशी | स्वदेशी |
| **१० वीच्या पालकांची पालकसभा** | |
| श्री. पंत फडके | प्रचारकांची आवश्यकता |
| श्री. बाळासाहेब नाईक | बंगालमधील कामाचा अनुभव |
| **उल्फा व देश विघटन** | |
| श्री. भास्करराव गद्रे | हर्षद मेहता प्रकरण |
| श्री. सुहासराव हिरेमठ | तरुणांमधील कामाचा अनुभव |
| श्री. सॅमसन | इस्रायलची कहाणी |
| श्री. संजय तांबट | मुंबई बैठकीचे वृत्त |

# अस्वस्थ वर्षाची अस्वस्थ पाने

आज १३ मे. 'स्व'रूप वर्धिनीच्या या वर्धापन दिनी प्रत्येक कार्यकर्त्याने स्वत:चे आत्मपरीक्षण करावे, भावी वर्षाचे नियोजन, निश्चय करावा अशी अपेक्षा! अर्थात मी देखील याला अपवाद नाही. आता आत्मपरीक्षण करायलाच हवे. . .

आज १४ जून. महाविद्यालयाचा निकाल लागला. चक्क पदवीधर झालो ते देखील पहिल्या वर्गात! माझं मलाच आश्चर्य वाटतंय! कारण वर्धिनीत आलो तेव्हा किती वेगळा होतो! पण आज? पाचवीलाच वर्धिनीत आलो. दहावीनंतर शिक्षण सोडून देऊन काहीतरी वेगळं करायच्या विचारात पण . . . घरच्यांनी आणि वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी समजूत काढून शिक्षण घ्यायला लावलं. महाविद्यालयात गेलो अन् आज पदवीधर होऊन बाहेर पडत आहे. भावी जीवनाच्या वाटचालीची पद्धती अजूनही निश्चित झाली नाही. पूर्णवेळ काम करायचं की विद्यापीठीय शिक्षण घ्यायचं याचा अजून निर्णय होत नाही.

'स्व'रूप वर्धिनीच्या वाटचालीची पथ्ये निश्चित ठरलेली आहेत. आपले काय? या भव्य स्पर्धायुक्त जगात आपणास एकदम यश मिळेल असा भ्रामक आशावाद बाळगण्यात हशील नाही. या लांब पल्ल्याच्या वाटचालीत कधी कधी पराभव हा आपल्या वाट्याला येणारच. पण त्यामुळे निराश व्हायला नको हेच वर्धिनीत गेल्या बारा वर्षात स्वत:च्या कृतीतून मनावर ठसविले आहे. मग आपण तरी याला अपवाद कसे व्हायचे? असो 'पुनश्च हरि: ॐ!'

आज १५ जुलै - वर्धिनीच्या कामात पूर्ण वेळ भाग घ्यायला परवानगी मिळाली नाही. ज्येष्ठांना मी त्या कामाला पात्र आहे असे वाटले नाही हा मी माझा पराभव समजतो. अर्थात मी या कामाला खरोखरच लायक नाही. मी ते काम करणे म्हणजे कार्याचे अवमूल्यन करणे. या विचारांच्या तिरमिरीतच आज ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी वादावादी झाली.

खरं तर एक मन वाद घालतानाच सांगत होतं की तू वाद घालू नकोस. कारण वादातून काहीच साधलं जात नाही. एकमेकांची मने मात्र तोडली जातात की जी परत सांधली जात नाहीत. सांधली गेली तरी खूण मागे उरतेच. खरं म्हणजे सध्याच्या प्रश्नांवर मात करायची असेल तर आपापसातील मतभेद विसरून परस्पर सामंजस्याने व सहकार्याने काम करण्याचा शहाणपणा दाखविणे आवश्यक आहे. हे सारे पटते पण अहंकार आडवा येतो त्याला काय करणार?

आज १६ ऑगस्ट - आज वर्धिनीला खेळायचे मैदान नाही. शिक्षणमंडळ जागा देत नाही, खेळू देत नाही. विद्येच्या माहेरीच हे सारे प्रकार चालू आहेत. तरी देखील परिस्थितीपुढे शरणागती पत्करणारे वर्धिनीचे कार्यकर्ते कसे असणार? (मी मात्र अडचणी येताच दूर पळण्याचा पयत्न करतो ते सोडा!) आजच आगरकरांविषयी वाचले. त्यातील पुढील ओळी महत्त्वाच्या वाटल्या. 'शंभर आगरकर व्हावे लागले तरी हरकत नाही पण सुधारणा ही होणारच'

आपला स्वभाव तर वाहत जायचा! गावस्करने शतक ठोकले की गावस्कर व्हावेसे वाटते. अत्रे जयंतीला अत्रे व्हावे असे वाटते. काय होणार आपले? व आपण कोठे जाणार?

आज १७ सप्टेंबर - सहज चाळा म्हणून ग्रंथालयात चक्कर मारली. ग्रंथालयात कितीतरी वेगळी पुस्तके पडलेली. कित्येक अज्ञात पुस्तकप्रेमींनी देणगी म्हणून पाठविलेली पुस्तके . मी फारसा कधीच पुस्तके वाचीत नाही. सहज सामाजिक प्रबोधनावरील एक पुस्तक उचलले अन् पान उघडले तर काय त्यात पुढील ओळी - 'नव्या कार्यकर्त्यांनी विचार आणि कृती यांचे नाते नीट समजून घ्यायला हवे. विचारांची व पुस्तकी ज्ञानाची उपेक्षा करून चालणार नाही. पुस्तक म्हटले तरी ते कोणाच्या तरी अनुभवातूनच तयार होते. 'आम्ही कृतिशील आहोत. वैचारिक काथ्याकुटाची आम्हाला

।। मन वज्र हवे अन मनगट ते पोलाद
जग जिंकायाची ईर्ष्या दाटो चित्ती ।।

गरज नाही.' ही भूमिका आत्मघातकी आहे. विचाराचा पाया नसलेली कोणतीही कृती परिवर्तन घडवून आणणार नाही. जगात ज्या ज्या क्रांत्या झाल्या त्या क्रांतीचे तत्त्वज्ञान अनुभवातून तेथेच निर्माण झाले होते.

आजपासून ठरविले आहे, भरपूर वाचन करावयाचे परंतु आपला हा संकल्प आजवरच्या संकल्पांप्रमाणे कोसळणार असेच वाटते!

आज १८ ऑक्टोबर! पुढील महिन्यात परीक्षा आहे. अभ्यासाला सुरुवात करायला हवी. वर्धिनीतून वेळ काढून जमलं तर अभ्यासासाठी भरपूर वेळ काढून यश मिळवायचे आहे. सध्या तरी अवघडच वाटते आहे.

आज १९ नोव्हेंबर. आज दुसरा अवघड पेपर संपला. आता असं झालं आहे की कधी एकदा परीक्षा संपते ते! इतके दिवस वेध होते ते सुरू होण्याचे तर आता संपण्याचे वेध लागले आहेत.

आज २० डिसेंबर आज मित्राला मद्रासला जाऊन वर्ष झाले. खरं तर नोकरीसाठी तो वर्धिनीतून तिकडे गेला. तो गेल्यावर त्याची उणीव जाणवत आहे. असंच असतं नाही का? मित्र आपल्या जवळ असताना आपल्याला त्याची किंमत कळत नाही पण तो दूर गावी गेल्यावरच कळते. इतकी वर्षे तो काम करीत होता. वर्धिनीत काही चांगल्या प्रथा त्याने सुरू केल्या तर काही गोष्टीत त्याला अपयश आले. हे यशापयश समजून घ्यायला हवे. काही बाबतीत त्याची निराशा झाली हे समजून घ्यायला हवे. अन्यथा आपल्या यशाची हमी काय? ज्येष्ठ कार्यकर्त्यांपासून शिकायला हवे म्हणूनच विचार आणि कृती यांचा मेळ बसण्याची नितांत गरज आहे. कदाचित विचारपूर्वक कृतीतूनच पुढचा विचार स्फुरेल. पुढे कदाचित कृती करता येईल.

आज २१ जानेवारी. नववर्ष सुरू होऊन २० दिवस झाले. नव्या वर्षातील आशा-आकांक्षा, ध्येये अजूनही ठरलेली नाहीत. बाहेर नोकरी शोधण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. परंतु अजून तरी यश नाही. सर्वत्र बी फेकले आहे. कुठेतरी रुजेल.

२२ फेब्रुवारी - माणसानं आशावादी असावं हीच नववर्षाची शिकवण घेऊन चालायला हवे कारण इतके दिवस नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नाला यश आले नाही. आता मात्र पुढच्या महिन्यात मुलाखतीला बोलावले आहे. पाहुयात काय होते ते?

२३ मार्च - मुलाखतीला आठ- पंधरा दिवस होऊन गेले पण अजून निकाल नाही! काय होणार?

एप्रिल - एप्रिल फूल नव्हे पण एक तारखेला निकाल लागला व माझी निवड झाली. पण पूर्ण वेळ नोकरीला बोलवताहेत. मग वर्धिनीचे काम कोण करणार? नोकरी तात्कालिक व वर्धिनी चिरंतन, या तात्कालिकतेच्या नादात चिरंतनाचा विसर तर पडणार नाही ना? नोकरी हे तात्कालिक ध्येय ही पूर्वपायरी हे जर अंतिम ध्येयाशी जोडले नाही तर अशा पायऱ्या चढतानाच दमछाक होईल. मग जेव्हा पायऱ्या संपतील तेव्हा आपण असू का? तात्कालिकतेची पकड घेतल्याशिवाय यश मिळत नाही व तात्कालिकात गुरफटून गेल्यास अंतिम ध्येय दूर जाते. तात्कालिक व अंतिम यातील परस्पर संबंधाचा अचूक वेध घेण्यातच वर्धिनीच्या कार्यकर्त्यांच्या निर्णय शक्तीची व कार्यकुशलतेची कसोटी आहे. या बाबत माझ्यात जेवढी जागरुकता व समग्रलक्षी दृष्टी येईल तेवढ्या लवकर ही गुंतागुंत उकलेल. अन्यथा चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी माझी अवस्था होईल? चक्रव्यूह भेदणारा व्हायचं की त्यात अडकणारा व्हायचं हे ज्या त्या कार्यकर्त्यानेच ठरवायचं!

**— गणेश राऊत**

***

**असा मी. . . तसा मी. . . कसा मी कळेना**
**स्वतःच्या घरी दूरचा पाहुणा**

**पुन्हा कधी न का मिळायचे ते**
**ते माझे पण अपुले आपण**
**झुरते तनमन त्याच्यासाठी**
**उरते पदरी तीच आठवण**

# आदर्श शिक्षण

'स्व' रूपवर्धिनीसारख्या शैक्षणिक संस्थेमध्ये काम करण्याची जी सुसंधी मिळाली व एकंदरीत विचारांची जी उत्तम दिशा मिळाली या सर्व गोष्टी त्याच्या परिणामस्वरूप आहेत. वास्तविक पाहता हे सर्व विचार माझे एकट्याचे नाहीत; एकंदरीतच युवक शिक्षकांच्या अशा विषयावर गप्पा होतात त्यामधीलच हे विचार आहेत. हे विचार कदाचित सुसूत्र नसतील, भाषा सौंदर्य कदाचित कमी असेल किंवा थोडेसे अपरिपूर्ण देखील असतील परंतु एक गोष्ट नक्की की हे प्रामाणिक विचार आहेत.

अनेकदा आपल्या अवतीभवती लोकांची ओरड आपण ऐकत असतो. 'शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे' शिक्षणाचा ऱ्हास म्हणजे काय? याचा आपण विचार करू लागलो तर मायावी चक्रव्यूहात प्रवेश केल्यासारखे होईल. सुरुवात व शेवट काहीच हाती लागणार नाही.

### असाही सहभाग हवा आहे

१) आपण आपल्या मित्रांना ह्या संस्थेची माहिती सांगू शकता.

२) सहज जाता जाता हितचिंतकांबरोबर संस्थेची वास्तू पाहायला येऊ शकता.

३) दिवसातला तास- दीडतास संस्थेसाठी खर्च करू शकता.

४) शक्य असेल तर आर्थिक मदत करू शकता.

५) स्वत: नाही तरी हस्ते - परहस्ते आर्थिक सहाय्य करू शकता.

६) आपल्याकडील अनुभवांचा फायदा आम्हाला देऊ शकता.

ऱ्हासाचा विचार करण्यापेक्षा आदर्श शिक्षण म्हणजे काय याचा विचार करावा कारण सत्य एक असते परंतु त्याचा अभाव अनेक पद्धतींनी दाखविता येतो. म्हणूनच दोष शब्दबद्ध करण्यापेक्षा गुणांची व्याख्या सांगणे जास्त चांगले.

अगदी थोडक्यात सांगायचे तर शिक्षण म्हणजे एका पिढीतून दुसरीकडे ज्ञानाचे संक्रमण! कसे असावे हे संक्रमण? खऱ्या अर्थाने शिक्षण कशाला म्हणावे? खऱ्या शिक्षणातून निर्भयता निर्माण व्हायलाच हवी, आणि पैसा, प्रतिष्ठा आणि शहाणपण सर्वांपेक्षा निर्भयता व ज्ञानोपासनेतून निर्माण झालेले चारित्र्य यांचे सामर्थ्य जास्त आहे.

शिक्षण त्याला म्हणावे, ज्यामुळे नम्रता चाहुलही न देता मनाचा ताबा घेते. शिक्षण ही गोष्ट अशी आहे *The More you learn; the more you realize there is much more to be learnt!* ज्ञानसागर इतका अफाट आहे की कदाचित त्याच्या एका लहानशा कोपऱ्यामध्येच विचार- विश्व सामावलेले असावे. जसजसे त्याच्या खोलीचा आपण अंदाज घेण्याचा प्रयत्न करावा. तसतसे त्या उदार उदधीच्या औदार्याबरोबरच आपल्या नौकेच्या मर्यादांची रास्त जाणीव होऊ लागते. आणि यातूनच नम्रता येते. अंतिमत: अहंकाराचे अस्तित्व संपवून, अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारे ते खरे शिक्षण!

शांतिनिकेतनच्या दीक्षासमारंभामध्ये एकदा तेव्हाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी उद्गार काढले होते, "To think is to feel responsible" विचारप्रवृत्त करून जबाबदारीची जाणीव करून देणारे ते खरे शिक्षण! विचार न करता शिकत जाणे म्हणजे पचविल्याशिवाय पोट

भरत जाणे. वस्तुतः विचार करायला शिकणे हे अत्यंत प्राथमिक आहे. ते जमल्यास शिक्षणाचा मोठा टप्पा पार पडला हे नक्की. परंतु दुर्दैवाने आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये याचा अंतर्भाव दिसत नाही.

विचारप्रवृत्त करणारे शिक्षण हवे. शिकायचे कसे ते शिकविणारे शिक्षण हवे. ज्ञानसागरात न्हाऊन काढणारे शिक्षण हवे. 'ज्ञान' शब्दाची उत्पत्ती पहा. 'ज्ञा' हा धातु आहे 'ज्ञा' म्हणजे जाणून घेणे आणि 'त्यापासून 'ज्ञान' हा शब्द तयार झाला आहे. हा शब्द Active आहे. स्वतः कार्यरत आहे. Passiveनाही. ज्ञान करून घ्यायचे असते ते अन्य कोणी बळजबरीने डोक्यात भरायचे नसते! ही जाणीव करून देते ते खरे शिक्षण! काहींना ही जाणीव आतूनच येते; परंतु असे ज्ञानेश्वर दुर्मिळच!

सर्वसामान्यतः आपल्यामध्ये अशी एक समजूत दिसते की ज्ञानी मनुष्य अनावश्यक गंभीर, माणुसघाणा आणि विक्षिप्त असतो; परंतु जर असे असेल तर माझे तरी मन त्याचे उत्तम शिक्षण झाले आहे असे म्हणण्यास धजणार नाही. जर ज्ञानामुळे सर्व गोष्टींबाबत उदासीनता येत असेल, रस नाहीसा होत असेल, निष्क्रियता येत असेल तर, काय उपयोग त्या ज्ञानाचा आणि शिक्षणाचा? हे मी देखील मान्य करतो की अशीही अवस्था, अशी उदासीनता येऊ शकते. परंतु ती अगदीच जे योगीपदाला पोहोचले असतात त्यांच्याबाबतीत! समाधी म्हणजे काय? पूर्ण ज्ञान होणे म्हणजे समाधी! पूर्ण ज्ञान होणे म्हणजे ब्राह्मण होणे ! मला कधी कधी खरोखर आश्चर्य वाटते. विवेकानंदांनी कालीमातेजवळ ज्ञान भक्ती आणि वैराग्य या तीन गोष्टींची मागणी केली. फक्त ज्ञान पुरेसे होते; कारण ज्ञानी विभक्त कधी असूच शकत नाही. आणि वैराग्य हे तर ज्ञानी माणसाचे भूषण! असो!---- जगाशी असलेली आपली नाळ तोडून टाकते ते शिक्षण नव्हेच! जगाशी नाते दृढ करणारे शिक्षण खरे! विनम्र अभिमानाने मला हे नमूद केलेच पाहिजे की शिक्षणातील हा संस्कार वर्धिनीत फार सुंदररीत्या केला जातो.

अब्राहम लिंकनचे मुख्याध्यापकांस लिहिलेले पत्र अतिशय सुंदर आहे. त्यातल्या चार ओळी उद्धृत करण्याचा मोह आवरत नाही. तो म्हणतो,

'मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा, सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला, पाहू दे त्याला पक्ष्यांची अस्मानभरारी--- सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर ---आणि हिरव्यागार डोंगर उतारावर डुलणारी चिमुकली फुलं------'

ज्ञानी आणि विचारवंत असला तरीही मनुष्य संवेदनशील आणि सौंदर्यदृष्टी जपणारा असायला हवा. उगवताना, मावळताना प्रतिदिन नवनवीन रंगांची उधळण करणाऱ्या मित्राबद्दल विस्मय निर्माण करणारे शिक्षण हवे. शांत पौर्णिमेच्या रात्री उसळणाऱ्या वाटांच्या खळखळाटात गुंग होऊन जाण्याची मनस्विता जागृत करणारे शिक्षण हवे. आणि दीडहजार हात उभा तुटलेला हरिश्चंद्राचा कोकणकडा पाहून मृत्यूस याहून चांगली जागा ती कोणती अशी भावनोत्कटता निर्माण करणारे शिक्षण हवे. सौंदर्यदृष्टीची जोपासना करणारे शिक्षण हे खरे! दुर्दैवाने सौंदर्य हा शब्द स्त्री सौंदर्याशीच जास्त निगडीत असलेला दिसतो. परंतु सुंदरता सगळीकडे असते. सुंदरता कृतीमध्ये असते. विचारांमध्ये असते. सुंदरता स्वभावात असते, स्वातंत्र्याच्या जाणीवेत असते. मदतीच्या भावनेत असते. सुंदरता ओढ्याच्या संगीतात असते, सिंहाच्या ऐटदार चालीत असते, वसंताच्या आगमनात असते. सुंदरता सगळीकडे असते, फक्त ते टिपण्याची ताकद असणारी दृष्टी निर्माण करणारं शिक्षण हवे. लहानसान गोष्टींमधून आनंद मिळविण्याची क्षमता तयार करणारे शिक्षण हवे. ह्या पृथ्वीवरील सर्व पशुपक्षी

आनंदी दिसतात. मनुष्य मात्र तितकासा आनंदी दिसत नाही. याचे कारण अतिस्पर्धाशील वृत्ती! स्पर्धेत गुंतत गुंतत स्पर्धा कशासाठी हेच विसरल्यास आनंदास पारखे झाल्यास नवल ते काय? *'Winning is always over emphasized, in fact, the only time when it's really important is in surgery & war.* हे शब्द आणि त्यामागील कळकळ समजून घेण्याची पात्रता निर्माण करणारे शिक्षण! दुर्दैवाने शालये शिक्षणात *Home they brought her warrior dead* मधील कारुण्य, श्रावणमासी हर्षमानसीचा मोहक निसर्ग, *charge of the light brigade* मधील उदात्तता, कालिदासाची उपमा आणि ज्ञानेश्वरांची विश्वात्मकता या सर्वांमधून हृदय आनंदाने उचंबळून येण्या आधीच गुणांनी सर्वांचे मूल्यमापन केले जाते आणि कटुता निर्माण होते.

शिक्षणाच्या बाबतीत आपण फार मागे आहोत. आपण अत्यंत कमी विचार करतो याबाबत! उदासीन आहोत आपण याबाबत आणि त्यामुळे आजच्या शिक्षणपद्धतींमधून निरोगी, सुदृढ मने घडवण्याऐवजी नवीन नवीन दोषोत्पत्ती वेगाने होत आहे. कोणी तरी रवींद्रनाथ कोसळणारे आभाळ सावरण्याचा प्रयत्न करतो. परंतु एकटा पडतो. 'श्रीकृष्णाची करांगुलीसुद्धा एवढी एकटी नव्हती जितके रवींद्रनाथ या क्षेत्रात एकटे होते. समविचारी आणि समध्येयी माणसांनी एकत्र आले पाहिजे तरच शिक्षणक्रांतीचे अमृतमंथन यशस्वी होईल.

'स्व' रूपवर्धिनी शिक्षणक्षेत्रातील समविचारी व्यक्तींचे व्यासपीठ असावी अशी आकांक्षा आहे. या क्षेत्रात खारीचा प्रयत्न चालू आहे. आतापर्यंत मिळालेले यश पाहता निःस्वार्थपणे आणि सुस्पष्ट विचारधारेने काम करत गेल्यास अशा पिढीचे निर्माण सहज शक्य आहे की जी म्हणेल,

न त्वहं कामये राज्यम्, न स्वर्गम् न पुनर्भवम्।<br>
कामये दुःखतप्तानाम् प्राणिनाम् अर्तिशानम् ॥<br>
(मला राज्याची लालसा नाही, स्वर्गाची आणि मोक्षाचीही नाही. दुःखी जनांचे दुःखनाश करण्याची मी कामना करतो.)

**— पराग जगताप**

With Best Compliments From

**SOUDH PRAMOTORS**

40/28 Bhonde Path,
Karve Road, Erandawana,
Pune – 411 004.

Tel No. 333211

**हेमला**

आयुर्वेदिक औषधीयुक्त
केशवर्धक सुगंधी शिकेकाई

**उत्पादक मे. के. विजय प्रॉडक्टस्**
१४६ शनिवार पेठ, पुणे ३०. फोन - ४३५७९४

# शाखावृत्त

## समर्थ रामदास शाखा

**केल्याने होत आहे रे , आधि केलेचि पाहिजे !**

विद्यार्थी आहे तसा स्वीकारायचा व पाहिजे तसा घडवायचा हे 'स्व'रूप वर्धिनीच्या ध्येय धोरणांपैकी अगदी मूळ गृहीत तत्त्व! पण आपल्या जवळची उपलब्ध साधने मर्यादित असतील तर थोड्याच पण निवडून घेतलेल्या वर्धकांना आपण घडविणार, हे सुद्धा 'स्व'रूप वर्धिनीचे अगदी सुरुवातीपासूनचे तत्त्व. पण मग ह्यामुळे समोरच्या उपेक्षित वस्तीतील मुलांचे काय? त्याच्यासाठी 'स्व'रूप वर्धिनीचे दरवाजे कायमचे बंद! अत्यंत लहान जागा, सुमार दर्जाची स्वच्छता, आजूबाजूला; बेकार, व्यसनी युवक आणि संपूर्ण अशिक्षित किंवा घोटवून घेतलेल्या सहीपुरतेच पालकांचे अक्षरज्ञान अशा परिस्थितीत मुलांचे काय?

ह्याच विचाराने 'स्व'रूप वर्धिनीच्या काही युवकांना अस्वस्थ केले व दि. १६ जानेवारी ९१ ला समर्थ रामदास शाखा चालू केली आणि वर्षा दीडवर्षात आश्चर्यकारक परिणाम हाती आले. कोणीतरी एका लिंबारामला संपूर्ण आदिवासी वेषात तिरंदाजी करताना बघतो काय! आणि त्याला योग्य ते मार्गदर्शन मिळताच लिंबाराम आशियायी अजिंक्यपद मिळवितो काय. समर्थ शाखेची आताची लक्षणे तरी अशीच आहेत. ह्यावर्षी आमच्या कांबळे ह्यांने ८४% गुण मिळविले! काही महिन्यांपूर्वी रस्त्यावर केवळ चकाट्या पिटणारी मुले मैदानावर शिस्तबद्ध कबड्डी खेळताना पाहिली की कार्यकर्ते सुखावून जातात.

• • •

### "तुम्ही कराल ते योग्यच असेल"

समर्थ शाखेत समोरच्या वस्तीतील बरीच मुलं येतात. त्यात काही अन्य धर्मीय मुलेही आहेत. मागील वर्षीचा एक प्रसंग.

कार्यकर्त्यांनी ठरविले की मुलांचे शब्दोच्चार व वाणी सुधारण्यासाठी संस्कृतमधील एखादे गीत, स्तोत्र शिकविले पाहिजे. ठरले! गणपतीचे दिवस होते. मुलांचे अथर्वशीर्ष तयार करून घ्यायचे व गणपती मंडळांपुढे मुलांनी ते सादर करावयाचे. तयारी सुरू झाली. मुलांनी घरी जाऊन पालकांना उत्साहाने वर्धिनीत काय काय घडते ते नेहमीप्रमाणे सांगितले. स्वाभाविकपणे काही अन्य धर्मीय पालकांनी मुलांना वर्धिनीत पाठविणे बंद केले. झाला प्रकार कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यावर संपर्क झाला व पालकांना वाणी, उच्चार सुधार हा हेतू सांगितल्यावर पालकांनी मुलांना निःशंक मनाने पुनः वर्धिनीत पाठवावयास सुरुवात केली. "तुम्ही कार्यकर्ते कराल ते योग्यच असेल" ह्या उत्साह वाढवणाऱ्या आश्वासक वाक्याने

• • •

### एक एक कर दीप जलाँए

आपल्या शाखेतील एक वर्धक दीपक जावळे. व्यायामाचे शरीर, शाळेतर्फे कुस्तीसाठी प्रतिनिधित्व केलेला. वस्तीत राहाणाऱ्या एका मुलाने शाळा सोडल्याचे त्याला समजले. झालं. दीपकने त्याला गाठले. वारंवार भेटून शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. स्वतः व तो मुलगा असे दोघे रास्तापेठ हायस्कूलमध्ये रात्रप्रशालेची चौकशी करावयास गेले व खटपट करून त्या शाळा सोडणाऱ्या मुलास रात्र प्रशालेत प्रवेश

**साधकोंका संघटन राष्ट्र सेवा में हो समर्पण।**

मिळवून दिला.

कामकाजाच्या दिवशी आठ नऊ पर्यंत उठणारी, शाळेत न जाणारी, अभ्यास न करणारी मुले सकाळी आंघोळ करून अभ्यासाला बसतात, रविवारी सुट्टीचा दिवस असून पहाटे साडेपाचला संस्कृत वर्ग व त्यानंतर सकाळी ६।। वाजता मानसिक विकास, बैठकीला उत्साहाने येतात.

• • •

**"वर्धिनीत जाऊ न देण्याच्या धमकीचा छान उपयोग होतो."**

पालक सभेमध्ये बरेच पालक आपापला अनुभव सांगत होते. मुनीरखानचे पालक उठले व म्हणाले मी व आमची मंडळी दोघेही पूर्ण अशिक्षित. पण ----- सगळ्या घरात सुधारलेला आहे. अभ्यासाला किंवा चित्र काढायला बसला की त्याला घरातले काम सांगितलेले आवडत नाही मग काम केले नाहीस तर वर्धिनीत पाठविणार नाही, असे म्हटले की लगेच काम ऐकतो.

एकूण काय वर्धिनीची मात्रा फारच प्रभावी ठरते.

• • •

**"घ्यावी ही निष्कामता"**

समर्थ शाखेतील वर्धक वर्धिनीचे काम अगदी जीव ओतून करणार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मदिवस म्हणजे वर्धिनीचा रक्तदान यज्ञ. झालं! मागच्या वर्षी २०० बाटल्यांचे लक्ष्य ठरविले. सर्व मुलांना जास्तीत जास्त रक्तदाते आणण्याबद्दल सांगण्यात आले. आम्ही कार्यकर्त्यांनी प्रोत्साहनपर बक्षिसे जाहीर केली. पाच किंवा जास्त रक्तदाते आणणाऱ्यास 'एक लस्सी!' झालं! पाचच्या वर रक्तदाते आणणारे ४/५ वर्धक निघाले. रक्तदाना नंतर त्यांच्या जवळ 'लस्सी' चा विषय काढताच ते म्हणाले, "अहो सर, आम्ही काय लस्सी मिळते म्हणून काम करतो का? वर्धिनीचे काम म्हणून केले" केवढी ही आश्चर्यकारक निष्ठा!

घरातील एक जण सुधारला की पूर्ण घर सुधारते असे म्हणतात. अशीच प्रगती होत गेली तर मंगळवारपेठमधील उपेक्षित वस्ती येत्या काही वर्षात सुधारण्याची आशा नव्हे खात्रीच बाळगण्यास काहीच हरकत नाही.

**— सुभाष चलवादी**

***

## संभाजीनगर शाखा

२३ सप्टेंबर १९९० ला देवगिरी शाखेची सुरुवात झाली. एका कार्यकर्त्याद्वारे काम सुरू होऊन आता नियमितपणे ५ कार्यकर्ते शाखेचे काम बघत असतात.

(इथलं काम म्हणजे घरातील रुसलेल्या भावाची समजूत घालण्यासारखेच आहे. प्रसंगी गोंजारून दोन चार बरे वाईट शब्द ऐकून त्याला घरातील समारंभात सामील करून घ्यायचे आहे.) सेवा संस्कार संघटन या त्रिसूत्रीनसार सगळे काम चालते. विशेष म्हणजे या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम कसा असतो हे या शाखेत अनुभवावयास मिळते.

**आरोग्य केंद्र —** सकाळी चालणाऱ्या आरोग्य केंद्राचा उपयोग परिसरातील कबीरनगर, मिलिंदनगर, नागसेननगर, फुलेनगरमधील नागरिकांना होतो. संध्याकाळी याच वस्तीतील निवडक मुले शखेत येतात. त्यातून डॉक्टरांना मिळणारा आदर आणि कार्यकर्त्यांना मिळणारे प्रेम एकत्र झालेले दिसते.

**प्रौढ साक्षर वर्ग —** या वर्षीच्या ऑगस्ट पासून महिलांसाठीही काम सुरू झाले. प्रौढ साक्षरता वर्ग आतापर्यंत कधीही शाळेत जाऊ न शकलेल्या या मुलींसाठी अक्षरओळख व खेळ असे प्राथमिक स्वरूपाचे काम सुरू केले आहे.

सुरुवातीला खेळताना थोडेफार लागले तरी मुले शाखेत येणे बंद करीत. पण आता दोन महिने हात प्लॅस्टरमध्ये असताना 'राहुल आढाव' न चुकता शाखेत येतो. शाखेत कुणीही कार्यकर्ते

नसताना दोघे 'अनिल' सर्व शाखा व्यवस्थित सांभाळतात.

१४ एप्रिल, आंबेडकर जयंती, दसरा (धम्म चक्र प्रवर्तन दिन) इथले खास सण. परंतु शाखेचे 'सर' जेवायला येणार म्हणून हे सण दोन तीन दिवस अगोदर अथवा नंतर साजरे केल्याची उदाहरणे हे कार्याचे मुके बोल आहेत.

वार्षिक परीक्षेच्या २/३ दिवस आधी देवगिरी किल्यावर खास सहल काढण्यात आली. खास या अर्थाने की किल्ल्यावरच प्रथम मुलांकडून दोन प्रश्नपत्रिका मंडळाकडून सोडवून घेण्यात आल्या व नंतर किल्ला पहात होळी साजरी केली. विशेष म्हणजे पालकांकडूनही या वेगळ्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

२४ फेब्रुवारीस वीर लहूजी वस्ताद साळवे यांची जयंती व क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांची पुण्यतिथी आरोग्य केंद्रावर साजरी करण्यात आली. यावेळी शाहीर फाऊंडेशनचे श्री. सोनवणे, श्री. आप्पाभाऊ साठे, श्री. कांबळे हे उपस्थित होते.

यावेळी परिसरातील युवकांची आरोग्य केंद्र शाखा, एकूण वस्ती याविषयी असणाऱ्या अपेक्षांबद्दल एक बैठक घेण्यात आली. बैठकीचे संयोजन शहीर योगेश यांनी केले. यामुळे वस्तीतील युवकांशी संवाद साधण्यास सुरुवात झाली. इथल्या मुलांसाठी पुण्याची शाखा, शिबिर कुतुहलाचा विषय तसेच स्पर्धेचा विषय असतो.

६० टक्क्यांवर गुण मिळविणाऱ्यालाच पुण्याला पाठविले जाईल. अशी सूचना देताच मुले इतर काही न सांगता आपसूक अभ्यासाला लागतात.

पुण्याहून आल्यावर मुले न सांगता कामाला लागतात. वेळोवेळी पुण्याला हे असे असते, असे नसते, याची आठवण करून देतात. यातूनच कार्यकर्ते हळूहळू घडत आहेत.

**— विलास कुलकर्णी**

***

## अखंडानंद शाखा

दरवर्षी वर्धिनीच्या सुट्टीत विविध विषयांवर शिबिरे होतात. शिबिराला जाण्यासाठी मुलांबरोबरच युवकही उत्साही असतात. पण काही युवकांना घरच्या जबाबदाऱ्यांमुळे पेपर टाकणे, दूध घालणे यासारखी कामेही करावी लागतात. व त्यामुळे २/३ जणांना शिबिराला मुकावे लागणार आहे असे वाटू लागले पण त्यांच्यातल्याच एका पेपर टाकणाऱ्या युवक कार्यकर्त्यांनी त्याची जबाबदारी आपल्यावर घेतली व तो दोन दिवस आधी माहिती करून घेण्यासाठी हिंडला. बाकीचे सर्व युवक शिबिराला गेले. त्यानंतर हा कार्यकर्ता रोज आपल्याबरोबर त्यांचेही काम करून सकाळी १० वाजता शिबिरात हजर होई व रात्री तेथून परत घरी जाई. तो शिबिरात येत होता. शिबिर इतरांचं बुडू नये म्हणून स्वत: सकाळी तीन वाजल्यापासून धडपडत होता.

आपल्या शाखेतल्या वर्धकाच्या वडिलांचे दु:खद निधन झाले त्यावेळी युवक कार्यकर्त्यांनी म्हणजे ११ वी १२ वी च्या मुलांनी त्याच्या घरी १०/१२ दिवस रोज जाऊन सर्व मदत केलीच शिवाय त्याची आई, बहीण यांना सावरण्याचं कामही केले . हे सगळे १६/१७ वर्षाच्या मुलांनी इतक्या चांगल्या प्रकारे केले की त्याचा परिणाम त्या मुलांच्या नातेवाईकांवर व शेजारील घरांवर फार मोठा झाला हे आता रोज जाता येता जाणवते.

संतोष चिवेच्या पालकांनी शिबिरात १२५ मुलांना केळी वाटली.

***

**— उज्ज्वला जोशी**

**सर्व शाखांमध्ये, प्रकल्पांमध्ये विविध कार्यक्रम उपक्रम सातत्याने चालू असतात. त्यापैकी काही निवडक अनुभव**

### उत्साहाच्या आनंदाबरोबरच सामाजिक समस्येचेही भान

सार्वजनिक गणेश उत्सवात सर्व समाज आनंदाच्या, उत्साहाच्या वातावरणात असतो. या उत्सवात विसर्जन मिरवणुकीमध्ये 'स्व'रूपवर्धिनीची विविध पथके ही तर आता परिचयाचीच गोष्ट झाली आहे. परंतु याच उत्सवाच्या निमित्ताने समाज प्रबोधनाचाही एक छोटा उपक्रम या वर्षी चार शाखांनी व आजोळ प्रकल्पानेही केला. भगिनी निवेदिता, समर्थ रामदास या शाखेतील आणि आजोळ प्रकल्पातील मुला मुलींनी या वर्षी सामाजिक विषयावर पथनाट्ये अनेक गणेशोत्सव मंडळाच्या सहकार्याने सादर केली. या पथनाट्यांचे लेखन, दिग्दर्शन सर्वकाही वर्धिनीच्याच कार्यकर्त्यांनी केले होते हे विशेष आनंदाचे! या पथनाट्यांना मिळणारा प्रतिसादही काम करणाऱ्या कलाकारांना सुखावून गेला. सुमारे १२ ठिकाणी या पथनाट्याचे प्रयोग झाले.

**

### रक्तदान-'दान' नव्हे एक कर्तव्य !

१४ एप्रिल! डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला रक्तदान हा युवक गटाचा एक वार्षिक उपक्रम! प्रतिवर्षी मागच्या वर्षीपेक्षा अधिक रक्तदाते प्रत्यक्ष रक्तदानात सहभागी करण्याची प्रत्येकाची उमेदही पाहाण्यासारखी असते. या अनुकरणीय स्पर्धेत समर्थ रामदास शाखेतील छोट्या छोट्या वर्धकांनी सुमारे २५ रक्तदाते आणले. काहींना प्रेमाचा आग्रह करून तर काहींना त्यामागची सामाजिक गरज पटवून देऊन! गेल्यावर्षी प्रत्यक्ष रक्तदान १०२ बाटल्या झाले तर यावर्षीचा आकडा होता १३५ बाटल्या!

हा उपक्रम गेली ७ -८ वर्षे चालू आहे. या उपक्रमास यंदा पुणे मनपानेही शाबासकी देऊन अधिक प्रोत्साहित केले आहे. रक्तदानदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात पुणे मनपाने रक्तदानाचा उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना आमंत्रित केले होते. या सर्व संस्थांना एक छोटेसे स्मृतिचिन्ह देऊन प्रोत्साहित केले.

### हीच तर संवेदना जागवायची आहे.

१३ ऑगस्ट ९२! राखी पौर्णिमेचा सण. सर्व शाखांमध्ये ठरलेल्या ठिकाणी विद्यार्थी विद्यार्थिनी राखी बांधण्यासाठी गेले होते. निवेदिता शाखेतील मुलींचा आलेला अनुभव त्यांच्या शब्दातून वाचावा, ऐकावा असा आहे.

"..... काल प्रचंड पाऊस असूनही आम्ही १९ जणी मुलांच्या अंधशाळेत कोरेगाव पार्क येथे गेलो होतो. तेथील अंध मुलांना आम्ही राख्या बांधल्या. त्यांच्याशी गप्पा गोष्टी केल्या. त्यात एकाने विचारलेल्या प्रश्नाला आम्ही काहीच उत्तर देऊ शकलो नाही. तो छोटासा भाऊ विचारीत होता, "ताई तुम्ही येऊन आम्हाला राख्या बांधता परंतु ज्या मुली अंध आहेत त्या कोणाला राखी बांधत असतील हो?"

पाठ्य पुस्तकातून न होऊ शकणारा संस्कार त्या छोट्या मुलाने विचारलेल्या प्रश्नातून नकळतच वर्धकांवर झाला असेल आणि ही संवेदना जागविण्यासाठीच तर आपल्याला काम करायचंय!

**

### उनाड मुले सुधारू शकतात?

शाळा बुडविणारी, उडाणटप्पूपणा करणारी मुलं शिक्षकांच्या नजरेत कशी असतात हे सांगायला नको. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये तर असे दृश्य हे रोजचेच आहे. परंतु अशाही मुलांना वात्सल्य दिले तर काय होऊ शकते, याची प्रचीती समर्थ रामदास शाखेच्या कार्यकर्त्यांनी काही महिन्यांपूर्वी घेतली. झालं असं . . . . ह्या शाळेत येणारी बहुतांशी मुले ही संस्थेच्या

इमारतीसमोर वा पलिकडच्या वस्तीमधील आहेत. त्यातील ९०% विद्यार्थी हे वर्धिनीत यायला लागले तेव्हा सर्व प्रकारच्या खोड्या करणारे, उनाड असे होते.

पण शाखेची आपुलकी आली आणि चित्रं इतकं बदललं की महानगरपालिकेच्या एका शाळेतील एक जागरुक शिक्षिका वर्धिनी पाहायला आलेल्या होत्या. काही मुलांच्या वागण्यातील, बोलण्यातील बदल त्यांच्या नजरेस आले. इथले काम, कामाची पद्धत, आत्मीयता पाहून त्या शिक्षिकेनेही आपणहून अशा कामाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**

### वर्धापनदिन - असाही

४ जुलै १९९२ वर्धिनीच्या विवेकानंद शाखेचा वर्धापन दिन नेहमीप्रमाणे शाखेवर तर साजरा झालाच पण शाखेच्या युवकगटाने या निमित्ताने कोथरुडच्या अंध मुलींच्या शाळेस भेट दिली आणि शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त अंध शाळेभोवतालचा बगिचा, परिसर, स्वच्छ केला, चार तास श्रमदान करून अंधशाळेचे वातावरण प्रसन्न करायचा एक छोटा उपक्रम यशस्वी केला.

**

### चारचौघी — या अशाही

प्रांजली लकडे, दीपाली पवार आणि संगीता बारणे यांना घेऊन पुष्पाताई नडे या वर्षी मे महिन्यात बेळगावला गेल्या होत्या. अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत सामाजिक चळवळ चालविणाऱ्या डॉ. भीमराव गस्ती यांच्या कामात खारीचा वाटा उचलण्याच्या इराद्याने या चौघीजणी गेल्या होत्या. निमित्त होते बालांचे आणि महिलांचे शिबिर! या दोन्ही शिबिरांची रचना, कार्यक्रम वर्धिनीच्या या कार्यकर्त्यांनी केले. महिलांच्या शिबिरात ३० महिला होत्या व यापैकी चारजणी देवदासी! प्रत्येकीची वेगळी कहाणी! परंतु आता भीमरावांच्या आधाराने उभ्या राहू पाहाणाऱ्या! प्रांताच्या, भाषेच्या सीमा केव्हाच गळून पडल्या!" सुरुवातीला स्वत:चे नावसुद्धा न सांगणाऱ्या या महिला निघताना कोणालाही सोडायला तयार नव्हत्या.

**

### एक तुतारी द्या मज आणून

शैक्षणिक चित्र एकूणच अस्वस्थ करणारे! त्यात सामाजिक समस्यांमध्ये गांजलेल्या विद्यार्थ्यांचे काय होत असेल? पण हे चित्र सुद्धा ठामपणाने कार्यकर्ता उभा राहिला की बदलायला सुरुवात होते.

वर्धिनीचा एक कार्यकर्ता विलास कुलकर्णी नोकरीच्या निमित्ताने औरंगाबाद येथे गेला. नोकरी व्यतिरिक्त उरलेला वेळ अर्थातच वर्धिनीच्या कामासाठी डॉ. आंबेडकर वैद्यकीय सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून संस्कार वर्ग उभा राहिला. या वर्गाच्या प्रगतीचे वृत्तही उत्साह वाढविणारे आहे. विलास लिहितो. . .

". . . प्रगती. . .

१) मागच्या वर्षीपेक्षा सर्वांचेच गुण वाढले.
२) ५०% खाली गुण मिळविणारी गेल्या वर्षी ११ मुले होती. आता फक्त ३ जण आहेत.
३) रोशन शामकुळे हा विद्यार्थी ७८% गुण मिळवून ७ वीत शाळेत १ ला आला.
४) ४ मुले शाळेत १ ली तर ३ जण २ रे आले.
५) वस्तीमधील लोकांकडून मुलांच्या सुधारणेबाबत प्रशंसा आणि मुलांच्या घरीसुद्धा समाधान. . ."

**

### खूप खूप वाचाल तर 'वाचाल'

अलिकडे दूरदर्शनच्या प्रभावाने मैदानात व ग्रंथालयात अभावानेच गर्दी असते. त्यामुळे अवांतर वाचनाची आवड तर निर्माण केलीच पाहिजे. यावर्षी मे महिन्यात अखंडानंद शाखेने एक कार्यक्रम राबविला. सर्वांना पुस्तके वाचायला दिली आणि प्रत्येकाने आपण कोणते पुस्तक वाचले त्या पुस्तकाची माहिती सर्वांना पुढे येऊन सांगायची. त्यामुळे पुस्तकाचे वाचनही लक्षपूर्वक होऊ लागले आणि पुढे येऊन माहिती सांगण्याची सवयही हळुहळु लागायला लागली.

**

### मला काहीतरी काम द्या

शारदामणी महिला विभागातर्फे वर्षभर सातत्याने शिवणवर्ग गृहशुश्रूषा वर्ग इ. महिलांना स्वावलंबी करणाऱ्या वर्गांचे आयोजन केले जाते. त्यातील एका गृहशुश्रूषा वर्गाचा समारोप २८ एप्रिल १९९२ रोजी वर्धिनीच्या इमारतीतच झाला. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून पद्मश्री डॉक्टर बानू कोयाजी उपस्थित होत्या. गृहशुश्रूषा वर्गातील महिलांचे अनुभव आणि एकुणच शारदामणी महिला विभागाचे काम ऐकून त्या आपल्या भाषणात म्हणाल्या मला इथे नुसते खुर्चीत बसायला बोलावू नका, त्यापेक्षा मला काहीतरी काम दिल्यास आनंद होईल.

डॉ. बानू कोयाजींसारख्या आदरणीय कार्यकर्तीने या विभागातील कार्यकर्त्यांना दिलेली ही शाबासकी होती.

याच विभागातर्फे याचवर्षी 'सुंदर माझे घर' ही महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करणारी व्याख्यानमाला योजण्यात आली होती. या व्याख्यानांना उपस्थित राहिलेल्या महिलांचा प्रतिसाद कसा होता याचे हे बोलके उदाहरण .... आपण शिकले पाहिजे, काहीतरी केले पाहिजे याची पूर्वीपेक्षा खूपच जाणीव झाली व त्यामुळे दोन महिला आपणहून प्रौढ शिक्षण वर्गाला बसू लागल्या.

**

### रंगल्या रात्री अशा

अभ्यासक्रमातील ग्रह गोल तारे परीक्षेपुरतेच कळतात पण आकाशाशी मैत्री करायला शिकवले तर ते अधिक जिवंत होतात. आणि त्यांच्याकडे पहातच रहावेसे वाटते. वर्धिनीचा एक कार्यकर्ता मिलींद पुरोहित याने या वर्षभरात अनेक वेळा रात्री रामकृष्ण आणि समर्थ रामदास शाखेतील ५ वी ते ७ वी मधील मुलांना रात्री इमारतीवर बोलावून आकाशातील ग्रहगोल ताऱ्यांच्या गमती जमती दुर्बिणीच्या सहाय्याने दाखविल्या. यातील काही जणांना या विषयाची अधिक आवड असल्याचेही यामुळे लक्षात आले आहे.

**

*With Best Compliments from :*

**INTERNATIONAL TRADE SYNDICATE**

Dealers in : Dyes, Chemicals & Sizing Materails
Raw Material For plant Industries
(Glue Flakes Technical Gelatines synthetic reasins pigments etc.)
93/ 95. Perin Nariman, Bazargate Street, 2nd Floor, Fort, Bombay 400 001

# शिवण वर्गातींल महिलांच्या प्रतिक्रिया

*वर्धिनीचे काम सुरू झाले ते मुलांच्या शाखांद्वारे . आता व्याप वाढत चाललाय . विविध शाखा, उपक्रम, वर्ग यांद्वारे वर्धिनी अक्षरशः घराघरात अन् हृदयात पोचली हे दाखवून देणारे सच्चे अनुभव त्याच महिलांच्या शब्दांत*

माझा प्रवेश शिवणवर्गामुळे झाला. वर्धिनीत साजऱ्या होणाऱ्या एखाद्या कार्यक्रमास सारे जण एकत्र येऊन आनंद व्यक्त करतात. खरोखरच ही संस्था इतर संस्थापेक्षा वेगळी असल्याने येथे मला नेहमीच यावेसे वाटते.

**- सुनंदा नारायण भोसले**

●

**वेळ वाढवा**

'स्व'रूपवर्धिनी हे नाव फार दिवसांपासून ऐकले होते. त्यामुळे वर्धिनी म्हणजे काय आहे ते पहायचे होते. सहज चौकशी केली असता येथे शिवण वर्ग चालतो अशी माहिती मिळाली.म्हणून मी प्रवेश घेतला.

इथे शिकविणाऱ्या बाई चांगल्या आहेत. परंतु शिकण्याचा वेळ फार कमी पडतो. तो वेळ वाढविला पाहिजे. तसेच आम्हाला विविध प्रकारचे कपडे शिकण्याची जास्त गरज वाटते. त्यासाठीच आम्ही येतो. हे शिक्षण आम्हाला वर्षभर मिळायला हवे. बाकी माझी काही तक्रार नाही. याचा विचार व्हावा.

**– सौ. लता दिगंबर कुंभारे**

●

येथे प्रवेश घेतल्यानंतर वेगळेच वातावरण पहायला मिळाले. आमच्या वर्गाची प्रथमच सहल गेली होती. हा एक वेगळाच अनुभव आम्हाला आला.

**– सौ. सुनीता सुदाम कांबळे**

---

देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे

**माझे माहेर - 'स्व'रूप वर्धिनी**

ॐ

माझे व स्वरूप वर्धिनीचे संबंध १९८७ पासून आहेत. माझी मोठी मुलगी एक वर्षाची होती तेव्हा पासून तिथेच शिकते.

'स्व' रूपवर्धिनीमध्ये मूळचे परावलंबी रूप बदलले जाते. रूपामध्ये गुणामध्ये वर्धन होऊन व्यक्ती नावारूपाला येते.

मी आणि माझ्या दोन्ही मुली त्या शाखेमध्ये शिकतो. आमच्या पाठीमागे पुष्पाताई व पटवर्धन सर होते. मी तर शाखेतच शिकले. माझ्या मुलींच्या पाठीवरही त्यांचाच आशीर्वादाचा हात असल्याने आम्ही पुढे आलो. चार पैसे कमवून स्वतःच्या पायावर उभे झालो आणि सन्मानाने जगू लागलो.

मी तर कधी पूर्वी घराबाहेरही पडत नव्हते. रात्रंदिवस घरकामामुळे मला कधी बाहेर पडताच आले नाही. पण पुष्पाताईंनी मला होमनर्सिंगचा कोर्स कर असं सांगितलं. पण सुरुवातीला मला एवढं धाडस नव्हतं.. मला असं वाटलं की मी शाळा सोडून १० वर्षे झाली. मी एवढं कसं पार पाडू शकेन? पण मी ठाम निर्धार केला आणि पुष्पाताईंचा आधार असल्यामुळे मी होम नर्सिंगचा कोर्स केला व त्यात उत्तीर्ण झाले. प्रमाणपत्रही मिळाले. मग मला पुष्पाताईंनी दीनदयाळ हॉस्पिटलमध्ये कामासाठी पाठवले. मी लक्षपूर्वक काम केले. आता सध्या मी आशीर्वाद हॉस्पिटलमध्ये काम करते. सर्व डॉक्टर माझे फार कौतुक करतात. मी पण पेशंटची सेवा मनापासून करते.

अशी ही शाखा सर्वांगांनी बहरलेली, सर्व प्रकारचे खेळ, वर्ग असलेली ही शाखा माझ्या मुलींचे आजोळ आहे. माझे माहेर आहे. आमच्या पाठीमागे शाखेचाच

वरदहस्त असल्यामुळे आम्ही सफल जीवन जगत आहोत.

**सौ. मीना वडके**

•

'स्व' रूपवर्धिनी ही एक शैक्षणिक संस्था असून आम्हाला त्यांचा फार उपयोग होत आहे. तसेच व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम यामुळे आम्हाला चांगलाच उपयोग होत आहे. आणि त्यामुळे आमची आध्यात्मिक वाढ चांगली होत आहे. इथं फक्त शिवण कामच शिकवत नाहीत तर इतर गोष्टींचे चांगले मार्गदर्शन आम्हाला मिळते. त्यामुळे आम्हाला सामाजिक गोष्टीसुद्धा समजायला लागल्या आहेत.

ही केवळ संस्था नसून आमचे घर असल्यासारखे वाटते . विविध कार्यक्रमामुळे आम्हाला चांगला फायदा होतो. तसेच चांगल्या प्रकारे बाई आम्हाला शिकवितात. तसेच आमच्या काही अडचणी नाहीत. **'स्व'रूप वर्धिनी स्वच्छ व टापटीप आहे. त्यामुळे आम्ही स्वच्छता कशी राखावी हे शिकलो.**

'स्व'-रूपवर्धिनीमध्ये शिवणक्लास, बालवाडी नर्सिंगहोम तसेच आजोळ घर असून प्रौढ शिक्षण वर्गही तेथे चालतो. **अशा चांगल्या प्रकारे मुख्यतः फक्त आपल्या पायावर कसे उभे राहावे याविषी 'स्व' रूपवर्धिनीत मार्गदर्शन करतात.**

**खास करून ज्यांना मोठ्या दवाखान्यात जायला परवडत नाही त्यांच्यासाठी 'स्व'रूपवर्धिनीने दवाखान्याची सोय केली आहे.**

**कु. शिल्या नेल्सन मकवाने**

•

लहानपणी जशी आई आपल्या बाळाला उभे करण्यास मदत करते तशीच गरजू व गरीब महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहाण्यास शिकविते ती दुसरी आई म्हणजे स्व'रूपवर्धिनी होय. तसेच गरीब होतकरू आणि अभ्यासू विद्यार्थ्यांची जाणीवपूर्ण म्हणून संबोधली जाणारी संस्था म्हणजे 'स्व'रूपवर्धिनी होय.

पहिल्यांदा या संस्थेत भाग घेताना मला लाज वाटत होती. एक प्रकारची भीती मनात वाटत होती. येथील शिक्षक, संचालक माझ्या बरोबर व्यवस्थित बोलतात की तुच्छतेने वागतात, का कठोर बोलतात. पण उत्तर उलट मिळाले. सर्व माहिती व्यवस्थित मिळाली. माझ्यात जो धीटपणा नव्हता तो मला पुष्पाताईंनी एखाद्या मोठ्या बहिणीप्रमाणे दिला.

आमच्या क्लासच्या बाई सौ. गुरव बाई यांना कोणाकडून कसे काम करवून घ्यावे हे माहीत होते. क्लासमध्ये पहिल्या दिवशी त्यांनी शिवण कामासाठी लागणारे साहित्य व त्याची माहिती सांगितली. नंतर मशीन कशी चालवावी ते सांगितले. कोणतेही शिवण शिकवताना त्याची आकृती काढून घेत असत व प्रत्येकीची आकृती पाहून मगच पुढे कागदावर कापून नंतर कापडावर कापून त्या शिवण करण्यास सांगत.

**मला मशीनवर बसायची फार भीती वाटत होती पण गुरव बाईंनी ती घालविली. आता मला मशीनवर बसले की उठावेसेच वाटत नाही.**

मला वाटते शिवण क्लास बरोबर भरतकाम, विणकाम व स्वेटर तसेच शोकेसच्या वस्तू तयार करण्यास शिकविले तर फार उत्तम होईलच व 'स्व'रूपवर्धिनीने हे काम हाती घ्यावे अशी माझी इच्छा आहे.

'स्व'रूपवर्धिनीमध्ये अनेक प्रकारचे सांस्कृतिक तसेच आरोग्य चिकित्सा आहाराबद्दल माहिती, स्त्रीमुक्ती संघटना, सणाची माहिती, खेळाची माहिती स्त्री उद्योगाबद्दल माहिती असे अनेक कार्यक्रम होतात व सर्वांच्या ज्ञानात भर पडते. तेच वर्धिनीमध्ये आल्यानंतर बुद्धीला लागलेला गंज दूर होतो. वर्धिनीमधील शिक्षक, चालक व लहान थोर असे काही वागतात की एकाच कुटुंबात राहातात. गरिबीतून सुधारत आलेल्या 'स्व'रूपवर्धिनीचे कुठल्या शब्दांत वर्णन करावे हेच सुचत नाही. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे ज्ञानाचे भांडार असणाऱ्या 'स्व'रूपवर्धिनीचे गुण गावे तेवढे थोडेच.

**सौ. अनिता द्वा. वालुंजकर**

१ जुलै १९९२ पासून आमचा शिवण वर्गाचा क्लास सुरू झाला. तेव्हा आम्हाला खूप भीती वाटत होती. पण

आता आम्हाला थोडे बरे वाटते. त्यात आम्ही रमून जातो. 'स्व'रूपवर्धिनीत आल्यावर आमची आम्हाला सुधारणा झाल्यासारखे वाटते. बाहेरचे वातावरण कळल्यावर बरे वाटते. आमच्या शिवण क्लासमधल्या शिक्षिका चांगल्या आहेत. त्या आम्हाला चुकले तरी समजून घेतात व हसून खेळून राहातात. क्लासमध्ये आल्यावर वेळ कुठे जातो ते आम्हाला समजत नाही.

**– सौ. गिता देवीदास गिरमे**

●

### अनुभव

'स्व'रूप वर्धिनी या संस्थेमध्ये आम्ही होम नर्सिंग शिकत आहोत. आम्हांला कसे अनुभव आले ते आम्ही लिहीत आहोत.

पहिल्या दिवशी म्हणजे १९.१.९१ ला आम्ही क्लासमध्ये गेलो तेव्हा आमची पहिली ओळख सौ. कलबाग ताईंशी झाली. त्यांनी आम्हाला परिचारिकेने काय काय करायचे ते समजून सांगितले. माझ्या मनात नर्सिंगची खूप गोडी वाटू लागली. व आपण कधी नर्स होऊ असे वाटू लागले. मग आम्हांला आमच्या मॅडमनी प्रॅक्टिकलसाठी २६.१.९१ ला कमला नेहरू हॉस्पिटलमध्ये यायला सांगितले. मग मी व माझ्या बरोबरीची एक मुलगी आम्ही दोघी मिळून स्त्री विभागात वॉर्डमध्ये गेलो. प्रथम तिथल्या सिस्टरांशी ओळख झाली. त्यांनी आम्हांला 'बेड' करायला सांगितलं. आम्ही बेड केलेले त्यांना खूप आवडले.

दुसऱ्या दिवशी आम्ही परत सकाळी ९ वाजता गेलो.

त्या दिवशी देखील आम्ही बेड केले. मग आम्ही सगळ्या रुग्णांची विचारपूस केली व त्यांनी आम्हांला त्यांना काय होतय ते सांगितले. प्रत्येकांने आम्हाला काय होतय ते सांगितलं आणि आम्हांला ते लगेच नवीन डॉक्टर म्हणून आलात का विचारायला लागले. आम्ही सांगितलं की 'नाही आम्ही एक नर्स म्हणून इथे प्रॅक्टिकलाठी आलो आहोत. तिथल्या सर्व पेशंटना आमचा स्वभाव खूप आवडला. ते आम्हांला विचारायला लागले की 'तुम्ही रोज येणार का?' आणि आम्ही केलेले त्यांचे बेड त्यांना खूप आवडले. त्यांनी रोज येणार का विचारल्यावर मी सांगितले की 'नाही, आम्ही फक्त शनिवारीच येणार.' पुढच्या शनिवारी गेलो तेव्हा आम्ही बेड तयार केले. आम्ही लेबर रुम मध्ये गेलो आणि जाऊन बघतो काय तर आमच्या आधी एक पेशंटची प्रसुती झाली होती. व त्या पेशंटला टाके घालताना पाहिलं त्यामुळे टाके कसे घालतात हे आम्हांला कळले. नंतर ५ मार्च पासून मी आणि माझ्या बरोबरच्या दोघी आम्ही तिघी मिळून रात्रपाळीस गेलो तेव्हा रात्रपाळीस कुंभारे सिस्टर आणि रणवीर सिस्टर होत्या. बाकी होत्या काही सिस्टर परंतु मला त्यांची आडनावं माहिती नाहीत. कुंभारे सिस्टरबद्दल मला आदर वाटतो कारण की त्यांनी आम्हांला खूप काही शिकवलं. प्रथम आम्हांला कुंभारे सिस्टरांनी सांगितलं की डिलिव्हरी बघताना घाबरायचं नाही. धीटपणा अंगात आणायचा आणि कुठल्याही कामाला लाजायचं नाही. त्याच दिवशी दोन प्रसूती झाल्या. आम्ही समक्ष डोळ्यांनी बघितल्या. मी तर खरोखरच मन घट्ट करून त्या डिलिव्हरी पाहिल्या.नंतर आम्ही तिघीजणी रणवीर सिस्टरबरोबर रात्री २.३० वाजता राऊंडसाठी गेलो. त्यांनी आम्हांला सांगितलं की पेशंटला काय होतंय ते विचारायचं मग त्यांचा केस पेपर पाहायचा. नंतर त्यांना गोळ्या औषधे द्यायची आणि ते सुद्धा प्रत्येक डबीवरचे नाव पाहायचं ही कशाची गोळी आहे हे खात्री करून मगच त्यांना गोळ्या द्यावयाच्या. त्यांनी आम्हाला खूप सुरेख शब्दांत आणि व्यवस्थितपणे सांगितलं त्यामुळे त्यांचा स्वभाव मला तरी खूप आवडला कुंभारे सिस्टरबरोबर आम्ही ६ तारखेला होतो. त्यावेळी त्यांनी आम्हांला 'टेंप्रेचर' घ्यायला शिकविले ताप कसा बघायचा? जर ताप असला तर तापावरची गोळी द्यायची नंतर पहाटेच्या वेळी आम्हांला बी. पी. कसे घेतात ते शिकवलं आणि मग सांगितलं की खालून वर जातो तो पारा किती आकड्याला थांबतो व वरून येताना किती आकड्याला सुरू होतो ते नीट समजावून सांगितलं त्यांचा तर स्वभाव मला खरोखरच खूप म्हणजे खूप आवडला. मी 'नर्स' झाल्यावर 'टेंप्रेचर' आणि बी. पी. बघताना त्या माझ्या डोळ्यांसमोर येतील आणि त्यांची आठवण सतत होईल.

# पथनाट्ये . . . . प्रतिसाद आणि अपेक्षा

*मे १९९० चे उन्हाळी शिबीर. विलास चाफेकरांच्या 'जाणीव' या कलापथकाने पथनाट्ये कशी करावीत हे प्रात्यक्षिकासह शिकविले. शिबिरात आत्मसात केलेल्या या कलेचा प्रत्यक्ष उपयोगाला सुरुवात झाली ती गणेशोत्सवापासून.*

*पथनाट्याद्वारे 'तुमच्या आमच्या समस्या' 'अंधश्रद्धा', 'हुंडाबळी', 'पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा' यासारखे सामान्यांच्या जिव्हाळ्याचे विषय जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावे या हेतूने गणेशोत्सव मंडळांपुढे, चौकाचौकातून पथनाट्ये सादर करण्यात आली. गणपती पहायला लोटणाऱ्या गर्दीचा अशा अभिनव पद्धतीने उपयोग करून घेतला गेला.*

*पथनाट्य सादर करणारे कलाकार कोणी फार मोठे अभिनेते नाहीत तर ५ वी पासून महाविद्यालयीन शिक्षण घेणारे विद्यार्थी- विद्यार्थिनी! यांची वेषभूषा प्रेक्षकांपेक्षा वेगळी नसल्यामुळे प्रेक्षकांना हे कलाकार त्यांचेच प्रतिनिधी वाटायचे.*

*केवळ गणपती पाहायला निघालेल्या आणि कसलेही उपदेशामृत न ऐकण्याचीच मानसिकता असलेल्या लोकांना रस्त्यावर खिळवून ठेवण्याचे हमखास साधन म्हणजे चित्रपटातील प्रसिद्ध गीतांच्या चालीवर रचलेली गीते. 'शिक्षण पाहिजे मला भवानी आई रोडगा वाहीन तुला', 'या गो भारत देशांत अंधश्रद्धा बरीच वाढली' यासारख्या गीतांमधून या साधनाचा प्रभावी वापर केला गेला.*

*या पथनाट्यातून अस्वच्छता, बेकारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, विदेशी कंपन्यांनी चालविलेली लूट, निरक्षरता, हुंडा हे विषय परिणामकारकरीत्या मांडले गेले. त्याचबरोबर या प्रश्नांच्या उत्तराचे दिग्दर्शनही केले गेले.*

*पथनाट्याचं अंतिम उद्दिष्ट म्हणजे जनजागरण पण रस्त्यावरून जाता जाता पाहिलेल्या पाच-दहा मिनिटांच्या पथनाट्यातून खरंच लोकजागृती होते का? पथनाट्यातून जनजागरण होऊन हे प्रश्न सुटतात का? हे आणि यांसारखे कितीतरी प्रश्न पथनाट्य सादर करताना भेडसावत असतात. परंतु Something is better than nothing या तत्त्वानुसार पथनाट्य पाहणाऱ्या लोकांना आपल्या समस्या आहेत तरी काय हे कळते हे ही विचारात घेतले पाहिजे.*

*पथनाट्य करणाऱ्यांनी ती जगायची असतात पथनाट्यातील एक अलिखित संकेत. पथनाट्यांचं यशापयश हा संकेत किती प्रमाणात पाळला जातो यावर ठरते. 'तुमच्या आमच्या समस्यां'वरील उत्तर मुली सांगतात तेव्हा 'मिले सूर मेरा तुम्हारा' म्हणत एकमेकांचे हात जुळवतात. हे हात एखादे काम करताना जुळतील का? साक्षरतेसाठी 'असे दिव्य आव्हान हे विक्रमाचे, जिणे राष्ट्रकार्यार्थ हो कांचनाचे' अशी शपथ घेणाऱ्या या मुली हे विक्रमाचे आव्हान पेलणार का? 'पाणी वाचवा, पृथ्वी वाचवा' सांगणारे समर्थ शाखेचे वर्धक वाहणारा नळ बंद करतील का? 'मी हुंडा देणार नाही. . .' अशी आवेशपूर्ण प्रतिज्ञा घेणाऱ्या विद्यार्थिनी ती प्रतिज्ञा पाळण्याचा प्रयत्न करतील का?*

*या प्रश्नांची उत्तरेच पथनाट्यांचं यशापयश निश्चित करतील आणि या प्रश्नांची होकारार्थी उत्तरे देणाऱ्यांचा गट जसजसा वाढत जाईल तसतसे 'जनजागरण'हे पथनाट्याचं अंतिम उद्दिष्टही लवकरच दृष्टिक्षेपात येईल.*

**– कु. मनीषा बोईन**

*With Best Complimnents From :*

**M/S. ELECTROMARK ASSOCIATES**

42 Electronic Estate
Pune - Satara Road,
Pune 411 009.

# • बेळगावचे शिबिर •

बेळगावला आम्ही चौघीजणी म्हणजे पुष्पाताई नडे, संगीता बारणे, प्रांजली लकडे व मी शिबिर घ्यायला जाणार असे निश्चित झाले तेव्हा मला फार आनंद वाटला. आजवर डॉ. भीमराव गस्ती यांच्याबद्दल पुष्कळ ऐकले होते. परंतु प्रत्यक्ष भेटीचा योग येणार होता म्हणून मी अगदी खुशीत होते.

डॉ. भीमराव गस्ती हे बेळगांवचे एक भूषण आहे. भीमरावांचा जन्म बेरड समाजात झाला. या समाजाला पुढे आणण्याठी त्यांची धडपड चालू आहे. भीमराव गस्तीं हे बेरड समाजात एकटेच 'विद्यावाचस्पती' पदवी (पीएच्.डी.) मिळविलेले बेरड समाजाचा उत्कर्ष व्हावा म्हणून त्यांनी 'उत्थान' या संस्थेची निर्मिती केली. याबरोबरच देवदासींचे संघटन, बेरडांचे विस्थापन व त्यांच्या नोकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न, देवदासींना पेन्शन मिळावे यासाठी त्यांनी केलेला संघर्ष हे सारे बेळगावला गेल्यावर कळले. 'बेरड' हे त्यांचे गाजलेले आत्मचरित्र असून त्याला विविध पारितोषिके मिळाली आहेत.

बेळगावला श्री गस्ती यांनी देवदासींचे शिबिर आयोजित केले होते. या शिबिराचा फायदा सुमारे ३०-३५ महिलांनीं घेतला. या शिबिरात आम्ही विविध विषयांवर चर्चा, वर्धिनीची माहिती, वर्धिनीचे विविध क्षेत्रातील कार्य सांगितले. याबरोबरच बाल-वाडीच्या मुलांचे शिबिर घेतले, हे शिबिर पुष्पाताईनी तेथील शिक्षिका पाटील बाई यांच्या बरोबरीने घेतले. या मुलांबरोबर वावरताना भाषेचा अडसर फारसा जाणवला नाही. मुलांबरोबर आम्ही मूर्तीकाम, मातीकाम, चित्रकला विविध स्पर्धा यात अगदी रंगून गेलो. त्या मुलांचा आम्हाला त्या फार थोड्या कालावधीत लळा लागला. त्यांच्या विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा घेऊन बक्षिस समारंभही केला. या शिबिराची गंमत म्हणजे यात मराठी व कानडी दोन्ही प्रकारची मुले असल्याने पुष्पांताई बोलून झाल्यावर कानडी शिक्षिका त्याचे भाषांतर करत त्यामुळे सर्वांना कळायला थोडा वेळ लागत होता. तरीही शिबिर अतिशय प्रभावी झाले. भीमरावांना तर फारच आनंद झाला होता. समारोपाच्या दिवशी जे पाहुणे आले होते ते ओळखीचेच निघाले. ते एक स्वातंत्र्यसेनानी होते. व त्यांनी वर्धिनीस भेट दिली होती. पाहुण्यांच्या हस्ते चित्रकला, मातीकाम, गाणे यात ज्यांचे नंबर आले त्यांना बक्षिस वाटप झाले. संध्याकाळी मोठ्या गटाच्या स्पर्धा झाल्या. या मुलांना बक्षिस स्वत: भीमरावांनी दिले.

तेथील माणसे फारच छान आहेत त्यांच्याकडे आपुलकी फार आहे. गावात जाऊन तीन चार दिवस झाले असतील, पण या तीन चार दिवसांत रोज संध्याकाळी शेजारचे लोक न्याहरीसाठी अगदी ओढून घेऊन जात असत. भीमरावांच्या घरचे जेवण तर विचारता सोयच नाही. चुलीवरची भाकरी आमटी भात हे रुचकर जेवण आम्हाला इतके वाढत की बापरे!

दुसऱ्या दिवशी रामतीर्थच्या महिलांचे शिबिर होते. या शिबिरास शिवणवर्गाच्या गावातीलच २० ते २५ जणी व चार देवदासी स्त्रिया आल्या होत्या. जाताना सर्वांशी जास्त ओळख नव्हती पण नंतर सर्वजण मन मोकळे करून बोलले. रामतीर्थ हे ठिकाण अतिशय सुंदर होते. तिथे आम्ही एक लग्न पाहिले. तिथली लग्नाची पद्धत फार बेगळी आहे. तिथे वरातीत मुरमुरे उधळतात.

नंतर आम्ही गोल करून बसलो. हे शिबिर कशासाठी आयोजित केले आहे. हे भीमरावांनी सर्वांना सांगितले. व आमची ओळख करून दिली. मग पुष्पाताईंनी वर्धिनीची ओळख थोडक्यात करून दिली. नंतर सर्वांशीच आम्ही बोलायला म्हणजेच गप्पा मारावयास सुरुवात केली. सर्वांना त्यांच्या अडचणी विचारल्या. त्यातीलच काही प्रतिक्रिया.

छबूताई म्हणून एक बारावीतली मुलगी अतिशय जिद्दी आहे. भीमरावांना मदत करावयाची तिला फार इच्छा आहे असे आमचे बोलणे झाल्यावर तिने सांगितले.

एक कानडी बाई होत्या. त्या स्वत: शिकलेल्या नाहीत. परंतु आपल्या इथे राहणाऱ्या महिलांना एकत्र करून प्रौढ शिक्षणाचा वर्ग घ्यायची इच्छा आहे.

देवदासी महिलांशी बोलताना असे कळले की त्यांनी जोगवा स्वेच्छेने स्वीकारलेला नाही. त्यांच्या स्वप्नात देवी येते व ती सांगते परंतु त्यांनी असेही सांगितले की आमच्या पुढच्या पिढीस आम्ही जोगवा मागावयास पाठवणार नाही. तेथील सर्व देवदासींची सर्व मुले-मुली शाळेत जातात. शिकतात. भीमरावांच्या कठोर परिश्रमामुळे या महिन्यापासून देवदासी स्त्रियांना महिना २०० रु. पेन्शन मंजूर झाले आहे. या महिलांनी आम्ही त्यांच्या मुलींना योग्य संधी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली. बेळगावचा अनुभव आयुष्यातील अविस्मरणीय असा ठरला.

**— दीपाली पवार**

आपण जेव्हा मोठी ध्येये गाठण्याची धडपड करत असतो तेव्हा स्वत:मधल्या अनेक क्षमता स्वत:लाच नव्याने कळू लागतात. मी उत्तम लिहू शकतो. मी उत्तम कलाकृती निर्माण करू शकतो. ध्येयपूर्तीच्या दिशेने केलेल्या धडपडीत अनेक शोध आपणाला अशा वाटचालीत लागतात. त्याचा आनंद खरोखर दीर्घकाल प्रेरणा देणारा असतो.

मात्र या आनंदासाठी स्वत:ला क्षणिक सुखांवर पाणी सोडावे लागते. या साऱ्याची सुरुवात स्वत:पासूनच करावी लागते. स्वत: उठून उभे राहिल्याशिवाय प्रगती करता येत नाही. 'स्व' पासून सुरुवात केल्यावर 'स्व' ची ओळख होऊन 'वर्धन' व्हायला सुरुवात होते. हा 'स्व' शेवटी समाजात विलीन व्हावा.

• • •

# ??? सामाजिक संस्थांचा आलेख पिढी दरपिढी उतरता का होतो ? ???

सामाजिक सेवाभावी संस्था हे आजच्या काळातले एक अविभाज्य अंग बनलेले आहे. देशात राजकारणाला मिळणारं अवास्तव महत्त्व, स्वत:च्या स्वार्थात, रमलेला माणूस, समाजातील न्यूनतेबाबत त्याच्या ठायी आलेली उदासीनता व तटस्थता या गोष्टींमुळे एखादी व्यक्ती वा काही व्यक्तींचा समूह हा संतापून उठतो! समाजातील दुर्बल घटकांच्या हालांमुळे कळवळून उठतो आणि मग 'इतर कुणावर अवलंबून राहाण्यात अर्थ नाही. आपण आपल्याच पासून सुरुवात करू! 'असा संकल्प सोडून ही व्यक्ती वा हा समूह छोट्या मोठ्या जमेल त्या पातळीवर काम सुरू करतो. आणि वर्षानुवर्ष एक निश्चित ध्येय डोळ्यापुढे ठेवून कार्यरत राहतो. काही वेळा प्रथम ध्येय वा उद्दिष्ट धूसर असते. पण वर्षानुवर्षाच्या कामातून अनुभवांतून त्यास एक निश्चितता लाभत जाते. त्याच्या कार्यास आकार येत जातो. त्या व्यक्तीने उभारलेल्या वा त्या समूहाने पसरलेल्या पसाऱ्याला आकार प्राप्त होतो. नि त्यातूनच उभी राहते एखादी खऱ्या अर्थाने समाजसेवेसाठी जन्मलेली संस्था.

अशा संस्थेत काम करणारे अशा संस्थेतून स्वत:चा काही लाभ व्हावा म्हणून कार्यास लागलेले नसतात. किंबहुना प्रथम असतात ते फक्त कष्ट, नि बहुतेक वेळा पदर मोडच करावी लागते. संपूर्ण समाजाचे कल्याण करणे हाच उद्देश असतो. स्वत:चा वेळ, स्वत:चा पैसा, स्वत:चे सुख इ. सर्व त्यासाठी वेचले जात असते. यामुळेच सगळे व्यवहार चोख असतात. स्पष्ट व उघड असतात. परिणामी अशा सामाजिक सेवाभावी संस्थांचा प्रारंभीचा प्रगती आलेख वरवर चढत जाणारा असाच असतो. अगदी अनेक अडचणी येत काम ठप्प होत पुढे सरकत असते तरी प्रगतीची दिशा ऊर्ध्वमुखीच असते.

या पहिल्या फळीच्या वा पिढीच्या प्रयत्नातून संस्था उभी राहते. या पिढीनंतर एकतर ते काम आपल्या पुरतेच मानून बंद करण्याचा पर्याय त्या पिढीपुढे असतो. किंवा मग ती चालविण्यासाठी नवी पिढी वा फळी तयार करावी लागते. नवी पिढी पहिल्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार होऊ लागते. पण तरीही पहिले कष्ट या नव्या फळीला ठाऊक नसतात. तसे कष्ट या फळीला अनुभवायला लावणे हे संस्थेसाठी हिताचे नसते नि या जुल्या पिढीला ते शक्यही नसतं. त्यामुळे उपलब्ध साधनांचा नवी फळी भरपूर लाभ उठवू शकते. साधने हाताळतानाच संस्थेची समृद्धता - ती साधने, अधिकार वा कार्यातून निर्माण झालेली असतात हे- या पिढीला जाणवते.

ही समृद्धता उपयोगात आणायची असते ती विशिष्ट लक्ष्य पूर्तीसाठी! प्रारंभी ही नवी फळी तसा उपयोग करतेही. याचे कारण जुन्या पिढीचे सदस्य त्यांच्यावर अंकुश ठेवून असतात. दोन पिढ्यांचा संघर्ष येथे हळूहळू रुजू लागतो. जुनी पिढी थोडे पण प्रामाणिक कार्यावर भर देणारी असते. हे कार्य आपल्याला हवे तसे पण मोठ्या निष्ठेने करणे याला ती विशेष महत्त्व देते. तर नवी पिढी हे कार्य व्यापक करण्यास उत्सुक असते. त्यासाठी अर्थातच काही परावलंबित्व अपरिहार्य ठरते हे परावलंबित्व वित्तीय म्हणजे पैशाच्या, जागेच्या, माणसांच्या वगैरे स्वरूपात असू शकते. हे परावलंबित्व

With Best Compliments from :

**ADEPT LABORATORIES**

*Karve Road, Pune 4.*

जुन्यांना नको असते; तर नव्यांना ती एक आवश्यक गोष्ट वाटत असते.

या परावलंबित्वामुळे अनेक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दबाव येत असतात. त्यामुळे मूळ कार्याला, हेतूला बाधा येण्याची भीती जुन्या पिढीला वाटत असते. पण तोपर्यंत नियंत्रणे बदलत जातात.

या रूपांतरात आणखी एक पिढी पुढे येते आणि ही पूर्णत: स्वतंत्र, विचारी, आक्रमक नि अधिक पुढचे पाहाणारी असते. ही द्विधा अवस्थेत पडत नाही. पहिल्या पिढीचे नियंत्रण ती जुमानत नाहीच. परिणामी एका अर्थानं संस्थेचा पसारा वेगाने वाढू लागतो. अनेक तडजोडी केल्या जातात. तत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. पहिली पिढी बाहेर पडते नि या संस्थेला, या कार्याला एक नवा व्यापक आकार प्राप्त होतो.

या आकारासाठी अनेक गोष्टींची किंमत मोजली जाते. संस्थेच्या लाभासाठी स्वत:च्या लाभासाठी संस्थेमार्फत इतरांचा लाभ करण्यासाठी धडपड करावी लागते. प्रथम संस्थेच्या लाभाचे कारण पुढे केले जाते नि तसे करताना व्यक्तिगत स्वार्थ त्यात कधी मिसळून जातात याचं भानही कुणाला उरत नाही. इथेच संस्थेचे मूळ कार्य नि व्यापक झालेलं कार्य यात दरी पडते. आणि संस्थेची वा कार्याची वाटचालच वेगळ्या दिशेने होऊ लागते. संस्थेच्या माध्यमातून सत्ता(राजकीयच असे नव्हे) मिळविणे, पैसा मिळविणे हे ध्येय बनते. एकदा ते मिळाले की मिळणाऱ्या धनावर वा इतर मालमत्तेवर आपलं अधिकाधिक स्वामित्व राहावे म्हणून धडपड सुरू होते. त्यासाठी आजपर्यंत संस्थेसाठी आपल्या विशिष्ट कार्यासाठी कष्ट उपसणारी एक दिलाने कार्य करणारी माणसं आता एकमेकांवर कुरघोडी करू पाहतात. त्यासाठी आपला गट मजबूत करण्याचा, निर्णयाधिकार अधिकाधिक आपल्यापाशी राहावेत यासाठी वेगवेगळ्या युक्त्या लढविल्या जातात. प्रारंभी संस्थेच्या कार्याची व्यापकता वाढविण्यासाठी योजलेले सर्व प्रकारचे मार्ग गटबाजीसाठी वापरले जातात. पैसा, संख्याबळ आणि सर्वात शेवटी शक्ती इ. चा वापर त्यात होतो. तिथं या संस्थेचे वा कार्याचे मूळ उद्दिष्टाशी असलेले सर्व बंध गळून पडतात. लोक म्हणू लागतात ही संस्था पूर्वी अशी नव्हती. पूर्वीची तत्त्वनिष्ठता, आपल्या कार्याबाबतची निष्ठा आता उरली नाही. लोक म्हणत राहातात. ते संस्था चालकांच्या कानी पडत राहते पण ते एवढे घसरणीला लागलेले असतात की माग फिरणं त्यांनाही जमत नाही.

संस्था स्वत: अशी वाटचाल करीत असताना आपल्या येथे या संस्थांची स्वच्छ प्रतिमा संपविण्यासाठी, त्यातून त्यांची समाजावर अंकुश ठेवण्याची शक्ती संपविली जाते. शासकीय स्तरावर मिळणारी मदत हे त्याचे एक साधन ठरते. स्वच्छ, प्रामाणिक निडर अशा व्यक्ती नि संस्था यांचा नेहमीच एक दरारा असतो. पण ज्या प्रमाणं या संस्थेतील लोक तिच्यावर आपलं प्रभुत्व राखण्यासाठी विविध शक्ती साधनांचा वापर करतात त्याचप्रमाणे समाजावर अंकुश ठेवणाऱ्या या संस्थांना काबूत ठेवण्याचा प्रयत्न सरकारी वा राजकीय पक्षांच्या स्तरावरून होत असतो. यामुळे ही संस्था अधिकच गढूळ बनते. तडजोडीवरच चालू लागते. या संस्थेतले लोक व राजकीय लोक यांच्या लाभाचा प्रथम विचार करून संस्थेचे कार्य चालते. तिचा दबदबा, तिची कार्य-तत्परता, इ. सर्व गोष्टी संपुष्टात येतात. संस्थेच्या पूर्वपुण्याईने ही तिसरी वा चौथी पिढी (वा फळी) फायदे चाखते तर बाहेरच्या (राजकीय व इतर) शक्ती एक दबदबा असलेली शक्ती आपल्या खिशात टाकतात. अशा रीतीने अशा सामाजिक संस्थेचा उदय ज्या कारणासाठी होतो ते कारण येथे पूर्णत: लोप पावते.

*With Best Compliments from :*

**M/s. Metafin Processor And**

**Brite Electroplates**

Tophkana Shivajinagar, Pune 411 005.

ही घसरगुंडी व हे लोप पावणे टाळता येणे शक्य आहे का? अशा काही संस्था आजही सुव्यवस्थितपणे चालू नाहीत का? त्या कशा चालतात? अशा काही संस्था आहेत हे खरं पण त्यांचा व्याप मूळ संस्थापक वा त्याच्या उद्दिष्टाशी सहमत व निष्ठावंत असलेल्या त्यांच्या अनुयायाने वा सहकार्यांनी सांभाळलेला असतो. अनेकदा अशा प्रकारे चालणाऱ्या संस्था कालानुरुप आवश्यक ते बदल करण्यात अयशस्वी होतात. परिणामी त्या जुनाट प्रकारे कार्य करतात नि या जगात कार्य व एक स्वत:ची अशी जागा हरवून बसतात. तेव्हा प्रश्न, संस्थेचे मूळ उद्दिष्ट लोप न पावू देताही या विश्वात आपली अशी एक जागा कायम ठेवू शकेल, अंध:कारात राहाणार नाही असे काही करता येणार नाही का हा प्रश्न आहे.

यासाठी काही गोष्टी करणे व काहींची दक्षता घेणे आवश्यक असते असे वाटते. संस्था कशीही म्हणजे पसरेल, व वाढेल तशी पसरू, वा वाढू न देणे दूरदृष्टी हवी नि द्रष्ट्येपणही हवे. यासाठी संस्था कसकशी आकार घेत जाईल याचा एक आराखडाच डोळ्यापुढे हवा. प्रसंगी लिखित स्वरूपात असला तर ते अधिक उपयुक्तच ठरते. संस्थेच्या स्थापनेपासून वा कार्याच्या प्रारंभापासूनच ही काळजी घेतली तर संस्था वा कार्य भरकटत पुढे जात नाही पुढे त्याची फरफट होण्याचे टळते.

दुसरी गोष्ट म्हणजे आवश्यकतेचा विचार करून माणसे उभी करणे, ती पूर्णत: पारखून घेणे, दिसेल त्याच्यावर वा संस्थेच्या संपर्कात येईल त्याच्यावर लगेच भरवसा टाकण्यापेक्षा माणसे पारखून घेऊन त्यांना कार्यरत करणे योग्य ठरते. शिवाय त्यांना एकदम जबाबदारीच्या कार्यात न घेता खालच्या पायरीपासून त्यांना सामावून घ्यावे. शक्य तर प्रस्थापित पसाऱ्यात त्यांना लहान मोठं स्थान देण्यापेक्षा त्यांचा उपयोग शाखा विस्तारासाठी व्हावा. म्हणजे जुन्यांना कार्य सुरू करताना येणाऱ्या अडचणी, त्यांचे कष्ट यांची कल्पना या नव्या मंडळींना येऊ शकते. मात्र निधी संकलनाचं काम संस्थापक मंडळींनी या नव्यांवर लगेच सोपवू नये म्हणजे लगेच पावती पुस्तक देऊन त्यांना पिटाळू नये. म्हणजे जो अधिक निधी देतो त्याचे महत्त्व वाढणे, या गोष्टी टळू शकतात.

निधी संदर्भातील दुसरा भाग म्हणजे शक्यतो जे लोक वा जे गट संस्थेच्या कार्यात लुडबूड करू शकतील अशांकडून निधी घेणे टाळावे . सरकारी मदत घेऊ नयेच. थोड्यांकडून मोठा निधी मिळविण्यापेक्षा अनेकांकडून थेंब थेंब करून निधी मिळवला जावा यामुळे संस्थेवर निष्कारण कोणी प्रभाव टाकू शकत नाही.

लाभतत्त्व बाजूला ठेवले तर लहानांतून बडे झालेले उद्योग ज्या व्यावसायिकतेवर कार्य करीत पुढे जातात व टिकून राहातात त्यातील कार्यपद्धतीचा आवश्यक तो भाग अशा सामाजिक संस्थांनी अंगिकारला तर त्याचाही मोठा फायदा संस्थेच्या कार्यासाठी व दीर्घकाळ ते कार्य टिकून राहाण्यासाठी मिळू शकेल.

अर्थात शेवटी अशा सामाजिक कार्य वा संस्था निघणे, चालणे टिकणे यासाठी एकच एक असे सूत्र नाही. पण त्यातल्या त्यात वर उल्लेखिलेल्या गोष्टींबाबत काळजी घेण्यात आली तर बराच फरक पडू शकेल असे वाटते.

**—अनिल पांडुरंग शिंदे**

•••


हार्दिक शुभेच्छा!

**मे. रमणलाल ट्रेडिंग कंपनी**

२३ भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे ४११ ००२.

नारळ, मिरची व किराणा मालाचे दलाल

फोन : रेसि : २०९६८

ऑफिस : दुकान : २१४७६

## ❋ स्वयंसेवी संस्था – नवे रूप, नव्या समस्या ❋

भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडण घडणीत स्वयंसेवी संस्थांचे कार्य फार मोलाचे आहे. देशात सर्वच पातळ्यांवर भ्रष्टाचार बोकाळला आहे, सर्वत्र अनीती पसरली आहे. अन्यायाला वाली उरला नाही. अशा अवस्थेत एकमेकांना दूषणे देत कोणतेच काम पूर्णत्वाला जात नाही. याची जाणीव असणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच या देशात अनेक पातळीवर विकासाला हातभार लावीत आहे. हे विसरून चालणार नाही. स्वयंसेवी कार्यकर्ते एकांड्या शिलेदाराप्रमाणे जमेल ते व तेवढे काम करीतच असतात, परंतु या प्रयत्नांनाही संघटनात्मक स्वरूप प्राप्त झाले तर हे काम आणखी जोमाने होऊ शकते असा अनुभव आहे. अमरावतीचे शिवाजीराव पटवर्धन व राळेगण शिंदीचे आण्णासाहेब हजारे या व्यक्तींनी असे काम करीत असताना त्याला संघटनात्मक स्वरूप प्राप्त करून दिल्यामुळे त्या कामाचा व्यापही वाढू लागला. वृत्तपत्रात छायाचित्र येण्यासाठी केलेले सार्वजनिक कार्य आणि स्वतःला वाटते म्हणून केलेले काम यात मूलभूत फरक असतो याची जाणीव जर राहिली नाही तर मात्र स्वयंसेवी संस्था 'दिखाऊ' बनू लागतात.

विकासकामांसाठी प्रशासकीय यंत्रणा पुरेशी नाही हे तर खरेच, शिवाय त्या यंत्रणेतील काही अंगभूत दोषामुळेही ती यंत्रणा अशा कामांसाठी पुरी पडू शकत नाही. साक्षरताप्रसार, कुटुंब नियोजन, अपंग कल्याण, व्यसनमुक्ती, अनाथ बालकांचा प्रश्न, स्वच्छता यासारख्या अनेक क्षेत्रात शासकीय यंत्रणेपेक्षाही स्वयंसेवी संस्थांचे कार्य भरीव झाले आहे हे मान्य करायला हवे. या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या प्रकारचा त्रास सहन करावा लागतो. एकतर उत्साह टिकू न देण्याच्या इराद्याने अनेक जण या कार्यकर्त्यांविरुद्ध दंड थोपटून उभे असतात. अनेकांना या कार्याची गरज आणि उपयुक्तता लक्षातच येत नाही. परिणामी असे काम करणाऱ्याला खूपच सहनशक्ती बाळगावी लागते. एवढे करूनही त्याला मानसिक समाधान तरी लाभते की नाही हा प्रश्न उरतोच. थोडक्यात आपापले व्याप उद्योग सांभाळून 'लष्कराच्या भाकऱ्या' भाजणाऱ्याला या उद्योगाचे महत्त्व कळत असले तरी समाजाला मात्र ते कळत नाही. त्यामुळे स्वयंसेवी कार्याला काही मर्यादा येतात.

याशिवाय आणखी एक समस्याही दुर्लक्षिण्यासारखी नाही. असे सार्वजनिक हिताचे काम करणाऱ्या कार्यकर्त्याला समाजाकडून शाबासकीची थापही मिळत नाही. लोकांनी आपल्याला चांगले म्हणावे, मान द्यावा या हेतूने कुणी असे काम करीत नसतो. आपण ज्या समाजात राहातो, त्यातील विषमता लक्षात येऊन ते काम करीत असतो. परंतु बऱ्याच वेळा त्याच्या वाट्याला वैफल्याची भावना येते. अशा कामातून अर्थार्जन अपेक्षित नसते हे खरे परंतु किमान प्रशस्ती अपेक्षित करणे मुळीच गैर नाही. मात्र या सामाजिक मान्यतेमुळे अन्य काही प्रश्नही उभे राहातात हे लक्षात घ्यायला हवे. या मान्यतेमुळे कामामागील प्रेरणा बदलण्याची एक भीती लक्षात घ्यायला हवी. तसेच यामुळे मानसिक पातळीवर निर्माण होणाऱ्या 'अहं'च्या प्रश्नाचाही विचार करायला हवा.

स्वयंसेवी कार्याचे संघटनात्मक स्वरूप जेवढे हितकारक असते, तेवढेच त्यामुळे नवनवे प्रश्न उभे राहाण्याची शक्यता असते. मानवी स्वभावानुसार संघटनात्मक कार्यात विकास कामाची प्रेरणा टिकवून

*With Best Compliments from :*

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp. Octroi Naka,
Pune Satara Road, Pune 411 009. Tel : 431111

ठेवण्यासाठी कोणते प्रयत्न करायला हवेत यावरही संशोधन व्हायला हवे. संस्था आली की तिथे पदाधिकारी आले आणि अधिकारपद आले की प्रश्नांची मालिका सुरू असा आजवरचा अनेकांचा अनुभव आहे. चार-दोन समविचारी कार्यकर्ते एकत्र येऊन कामाला लागतात, तेव्हा त्याला चढाओढीचे स्वरूप असत नाही. असे कार्यकर्ते वाढून त्यांची संघटना बनली की कायदे-कानूंच्या कचाट्यात सापडून तेथील प्रेरणास्रोत लुप्त होण्याचीमात्र भीती असते.

संघटनेत सर्वांना सारख्या तोलामोलाने राहता येण्यासाठी काही व्यवस्था करता येणे शक्य आहे का याचा विचार करायला हवा. काम करणाऱ्याला काम करू देण्यास प्रोत्साहन देणाऱ्यांची गरज अशा वेळी लक्षात येते. काम करणाऱ्याला काम केल्याचे समाधान मिळेल असे इतरांनी वागणे त्यासाठी आवश्यक आहे. अन्यथा काम करणाऱ्याचे पाय ओढण्याचेच प्रकार अनेक ठिकाणी घडताना दिसतात. सार्वजनिक कामामागील प्रेरणा टिकवून धरण्यासाठी कार्यकर्त्यांचे नवे संच उभे राहाण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहिले तर ही समस्या काही अंशी सुटू शकेल असे वाटते.

आणखी एका गोष्टीकडे लक्ष वेधणे फार आवश्यक आहे. जोपर्यंत कामाचा प्रश्न असतो तोपर्यंत त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न सोडविणे बव्हंशी शक्य असते, परंतु जेथे पैशाचा प्रश्न निर्माण होतो, तेथे मूळ काम बाजूला राहून नवे प्रश्न निर्माण होतात. सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणेतून काम करणाऱ्या कार्यकर्त्याला अधिकार, प्रसिद्धी आणि पैसा या त्रिसूत्रीपासून जेवढे बाजूला राहाता येईल तेवढे जास्त उपयुक्त ठरते. सार्वजनिक कामांसाठी समाजाच्या विविध स्तरांतून पैसा उभा राहू शकतो हा अनेकांचा अनुभव आहे. परंतु अशा परधनाचा विनियोग त्याच कारणांसाठी करताना जी अलिप्तता लागते ती अलिकडच्या काळात कमी होऊ लागली आहे असे वाटू लागते.

हे असे का घडते? त्यातून बाहेर पडण्यासाठी ठोस योजना नाहीत का? अशा प्रश्नांचा विचार करताना सार्वजनिक स्वयंसेवी कार्याला आता व्यावसायिक 'मूल्यांची' जोड देणे आवश्यक आहे. दिवसातील काही तास आठवड्यातील काही दिवस किंवा आयुष्यातील काही वर्षे अशा कामांना वाहून घेणाऱ्यांसाठी हे नवे मूल्य फार महत्त्वाचे आहे. व्यावसायिकता आणि व्यावसायिक मूल्य यामधील तफावत मात्र समजून घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक कामात एकमेकांवर किंवा समाजावर आपण उपकार करीत आहोत अशी कार्यकर्त्यांची भावना फार धोकादायक ठरू शकते. सामाजिक बांधिलकीची प्रेरणा कायम ठेवून कामातून स्वानंद मिळविण्यासाठी जर व्यावसायिक मूल्यांचा उपयोग केला गेला तर त्यातून आणखी भरीव कार्य घडणे शक्य आहे.

स्वयंसेवी संस्था या सामान्यत: एका व्यक्तीशी निगडित असतात. परंतु संस्थात्मक स्वरूपात 'सातत्य' फार महत्त्वाचे मानले जाते. एकांडेपणाने काम करणारे अनेक कार्यकर्ते एकत्र आल्याने कामाचा जोर वाढू शकतो. परंतु त्यांनी कार्यकर्त्यांची दुसरी फळी निर्माण करण्याकरता लक्ष देणे संस्थेच्या अधिक हिताचे असते. अनेक स्वयंसेवी संस्था तिचा 'मूळ पुरुष' गेल्यानंतर नावापुरत्या राहिलेल्या आपण पाहतो. आज अनेक संस्थांमध्ये राजकारण झिरपल्याचेही लक्षात येते. यामुळे कामावर विपरित परिणाम होतो. त्याहीपेक्षा गंभीर हे की, अशा कार्याकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टिकोनही हळूहळू बदलू लागतो. हे चित्र बदलण्यासाठी सर्वंकष विचारांची देवाण-घेवाण होणे म्हणूनच गरजेचे आहे.

**— मुकुंद संगोराम**

*With Best Complimnents From :*

**M/s. Decent Decorators** 81 - D - 2. M.I.D.C. Chinchwad,

FOR QUALITY COATINGS PUNE 411 009.

Phones : 83730, 82333, 55417

# दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व कामाच्या वेळा

| | | |
|---|---|---|
| १) | **रामकृष्ण शाखा** | |
| | २२/१, मंगळवार पेठ<br>पारगे चौक, पुणे ११ | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ९<br>शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०<br>रविवार स. ७.३० ते १०.०० |
| २) | **विवेकानंद शाखा** | |
| | भारतीय विद्याभवनचे छाब्रिया स्कूल,<br>शिवाजीनगर, पुणे १६ | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते ८.३०<br>शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०<br>रविवार स. ७.३० ते १०.०० |
| ३) | **अखंडानंद शाखा** | |
| | कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय<br>बिबवेवाडी, पुणे - ३७ | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३०<br>शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०<br>रविवार स. ७.३० ते १०.०० |
| ४) | **भगिनी निवेदिता शाखा** | |
| | आगरकर मुलींचे विद्यालय,<br>रास्ता पेठ, पुणे ११ | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३०<br>शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०<br>रविवार स. ७.३० ते १०.०० |
| ५) | **समर्थ रामदास शाखा** | |
| | २२/१ मंगळवार पेठ,<br>पारगे चौक, पुणे ११ | सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३०<br>शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०<br>रविवार स. ७.३० ते १०.०० |
| ६) | **आजोळ**<br>पत्ता : वर्धिनीची इमारत<br>प्रमुख – सौ. बागेश्री पोंक्षे | सोम. ते शुक्र. सायं. १ ते ५ |
| ७) | **बालवाडी (पाकोळी)**<br>पत्ता : वर्धिनीची इमारत<br>प्रमुख : श्रीमती पुष्पा नडे | सोम. ते शुक्र. स. १० ते १<br>शनि. ९ ते १०.३० |
| ८) | **कार्यालय वेळ** | सोम. ते शनिवार सं. ११ ते ५ |

Regd. No. F – 1694/PUNE

## NAME OF THE PUBLIC TRUST – 'SWA'–ROOPWARDHINEE

### BALANCE SHEET
### as at 31/3/1992

| Funds & Liabilities | Rs. | Property & Assets | Rs. |
|---|---|---|---|
| Trusts Funds or Corpus | 21,527.12 | Immoveable properties | 15,72,198.47 |
| Building Fund | 26,87,664.40 | (at cost) | |
| Loans | 36,501.00 | Investments | 3,96,000.00 |
| (Secured or unsecured) | | | |
| Liabilities | 9,199.85 | Furniture & Fixture | 89,959.16 |
| Balance as per last | | | |
| Balance Sheet | ( 93,298.29 ) | Advances | 32,710.00 |
| | | T. D. S. on dividend | 8,153.60 |
| | | Cash & Bank Balance | 5,62,572.85 |
| Total Rs. | **26,61,594.08** | Total Rs. | **26,61,594.08** |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liablities and of the Property and / Assets of the Trust.

माझ्या/आमच्या उत्तम माहितीप्रमाणे वरील स्थितीविवरणात दिलेल्या ट्रस्टच्या निधी आणि देयता मालमत्तेचा हिशोब खरा आहे.

**'स्व'-रूपवर्धिनी करिता**

खजिनदार    कार्याध्यक्ष    अध्यक्ष    ट्रस्टीची सही

Dated at
दिनांक

As per our report of even date.
त्याच तारखेच्या आमच्या अहवालाप्रमाणे

FOR U. B. GUJAR & CO.,
CHARTERED ACCOUNTANTS

Chartered Accountants    Auditors
चार्टर्ड अकौंटन्ट    ऑडीटर्स

Regd. No. F – 1694/PUNE

## NAME OF THE PUBLIC TRUST – 'SWA'–ROOPWARDHINEE

### INCOME AND EXPENDITURE ACCOUNT

**for the year ending 31/3/1992**

| Expenditure | Rs. | Income | Rs. |
|---|---|---|---|
| To Expenditure in respect of properties | 1,00,744.34 | On Bank Account | 31,317.20 |
| To Establishment Expenses | 77,416.49 | By dividend | 36,550.00 |
| To Audit fees | 650.00 | By Donation in cash or kind | 2,44,009.25 |
| To Contribution and fees | 536.60 | | |
| To Miscellaneous Expenses | 2,086.90 | By income from other sources | 84,318.50 |
| To Depreciation | 1,76,580.48 | | |
| To Expenditure on objects of the trust | 13,505.18 | | |
| Total Rs. | **3,96,194.95** | Total Rs. | **3,96,194.96** |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liablities and of the Property and/ Assets of the Trust.

माझ्या/आमच्या उत्तम माहितीप्रमाणे वरील स्थितीविवरणात दिलेल्या ट्रस्टच्या निधी आणि देयता मालमत्तेचा हिशोब खरा आहे.

**'स्व'-रूपवर्धिनी करिता**

खजिनदार कार्याध्यक्ष अध्यक्ष ट्रस्टीची सही

Dated at
दिनांक

As per our report of even date.
त्याच तारखेच्या आमच्या अहवालाप्रमाणे

FOR U. B. GUJAR & CO.,
CHARTERED ACCOUNTANTS

Chartered Accountants — Auditors
चार्टर्ड अकौंटन्ट — ऑडीटर्स

# कार्यकारिणी व मा. सभासदांची यादी

## सन्माननीय सभासद

श्री. जयसिंगभाई मरिवाला
श्री. नानासाहेब पवार
श्री. अविनाश वारदेकर
श्री. एम. ए. वदूदखान

*

## कार्यकारी समिती

**अध्यक्ष**

श्री. पु. व श्रॉफ

*

**उपाध्यक्ष**

श्री. अ. न. गोगावले

*

**कार्याध्यक्ष**

श्री. कृ. ल. पटवर्धन

*

**सहकार्याध्यक्ष**

श्री. व. ना. दाते

*

**सहकार्याध्यक्षा**

श्रीमती कुंतला मुजुमदार

*

**कोषाध्यक्ष**

श्री. श्री. शं. सामळ

*

**सचिव**

श्री. रा. प. देसाई

*

**सहसचिव**

श्री. शिरीष रा. पटवर्धन

*

**सभासद**

श्री. प्रतापराव पवार
श्री. वा. दे. संचेती
श्री. कां. गि. शहा
श्री. कृ. गो. लवळेकर
प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई
श्री. उदय गुजर
श्री. पुखराजजी जैन
सौ. चंद्राताई दलाया

*

## संपर्क

**कार्याध्यक्ष :**

श्री. कृ. ल. पटवर्धन
४२८/२०, शिवाजीनगर,
पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी : ३४५८३५

किंवा

**कार्यवाह :**


श्री. रा. प. देसाई
दूरध्वनी : ६६४३७५

किंवा

श्रीमती कुंतला मुजुमदार

**'स्व'रूप वर्धिनी**
२२/१, मंगळवार पेठ,
सोनावणे पथ,
पुणे - ४११०११
दूरध्वनी : २१७०४

# महाराष्ट्राच्या नियोजनबद्ध नवनगर विकासासाठी सिडको कटिबद्ध




सिटी ॲन्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड अथवा सिडको ही १९५६ च्या कंपनी कायद्याखाली स्थापन झालेली कंपनी असून ती महाराष्ट्र शासनाच्या पूर्ण मालकीची आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगर नियोजन अधिनियम, १९६६ अन्वये महाराष्ट्र शासनाने राज्यातील विविध ठिकाणी, नगर नियोजनातील अत्याधुनिक संकल्पनांप्रमाणे स्वयंपूर्ण नव्या शहरांचे नियोजन आणि विकास करण्यासाठी सिडकोची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून वेळोवेळी नियुक्ती केलेली आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. महाराष्ट्र शासनाने व्यक्त केलेल्या या विश्वासाला पात्र ठरण्याचा प्रयत्न सिडकोने १९७० सालापासून गेल्या दोन दशकात केला असून देशातील सर्वात मोठे नवे शहर नवी मुंबई, नवीन औरंगाबाद, नवीन नाशिक आणि नवीन नांदेड या नव्या शहरांच्या नियोजनाचे आणि विकासाचे काम वेगाने चालविले आहे. दिनांक १४ मे १९९० रोजीच्या अधिसूचनेद्वारे शासनाने वसई-विरार या ३८,००० हेक्टर्स क्षेत्राचे नियोजन करण्याचे आव्हानात्मक कामही सिडकोकडे सोपविले असून त्या प्रकल्पाच्या कामालाही सुरुवात झाली आहे. दिनांक २९ मार्च १९८९ रोजीच्या अधिसूचनेनुसार शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा मुख्यालयाच्या उभारणीचे कामही सिडकोकडे सोपविले. औरंगाबाद जवळील वलुज या औद्योगिक वसाहतीलगत शहरी नियोजन करण्याचे कामही शासनाने सिडकोकडे सोपविले आहे.

गेल्या दोन दशकांच्या काळांत शहर नियोजनाचे नि शहर विकासांचे गुंतागुंतीचे आव्हानात्मक काम पार पाडीत असतानाच सिडकोने स्वतःच्या बळावर ६०० कोटी रुपयांची उलाढाल केली आहे.

**सिडको:** नगरनियोजनांतील अत्याधुनिक संकल्पना

सिडको

नोंदणीकृत कार्यालय सिडको लि., निर्मल, २रा मजला, नरिमन पाईंट, मुंबई ४०० ०२१ टेलिफोन क्र. २०२२४२०
मुख्यकार्यालय सिडको लि., सिडको भवन सिबीडी-बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ टेलिफोन क्र. ७६७१२४१

सिडको: *नगरनियोजन आणि नगरविकास क्षेत्रातील भारतातील अग्रगण्य संस्था.*

**सिडको:** वेगवान विकासाची वीस वर्षे